
नागपूर
* वर्ष ५४ * अंक २०२ *
मंगळवार, दिनांक २९ ऑक्टोबर २०२४
किंमत रु. २/- + वितरण खर्च रु. १/-
एकूण किंमत रु. ३/-
पुरवणीसह पाने ८
Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in
मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com ● mahasagarngp@gmail.com



# विद्यापीठाच्या शैक्षणिक व संशोधन तसेच विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीवर समितीचा भर

## विद्यापीठात राज्यस्तरीय गुणववत्ता हमी कक्ष सेलची सभा संपन्न

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. २८ :

खाजगी संस्था, खाजगी विद्यापीठांशी आता स्पर्धा वाढत चालली आहे, अशा परिस्थितीत सार्वजनिक विद्यापीठांना शैक्षणिक, संशोधन आणि विद्यार्थ्यांची गुणवत्ता कशी वाढेल यावर भर द्यावा लागेल, असा एकंदरीत सूर विद्यापीठ राज्यस्तरीय गुणवत्ता हमी कक्ष सेल समितीच्या सभेत निघाला. कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या अध्यक्षतेखाली सभा संपन्न झाली. यावेळी सेलचे अध्यक्ष तथा विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. प्रमोद येवले, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, आदी उपस्थित होते. डॉ. येवले यांनी यावेळी उपस्थितांना विद्यापीठाची गुणवत्ता कशी वाढेल, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक व संशोधनात्मक भविष्य कसे घडविले जावू शकेल, याविषयी उपस्थित विद्यापीठाचे संवैधानिक अधिकारी व महाविद्यालयांच्या प्राचार्य यांना मार्गदर्शन केले.




डॉ. प्रमोद येवले मार्गदर्शन करतांना म्हणाले, गुणवत्ता हमी हा राज्यस्तरीय सेल असून शासनाने विद्यापीठ व महाविद्यालयातील शैक्षणिक गुणवत्तावाढीच्या दृष्टीने स्थापित केला आहे. शासन, विद्यापीठ आणि शैक्षणिक संस्थांमधील हा दुवा असल्याचेही त्यांनी सांगितले. विद्यापीठातील ज्या शैक्षणिक विभागाला जेथे शिक्षक व विद्यार्थी संख्या अधिक आहे, अशा निवडक चार ते पाच विभागांना ऑटोनॉमस करणे आवश्यक असून सर्व विभागांचे अकॅडमिक ऑडिट करणे, रिसर्च पेपर्स, प्रोजेक्ट यांना कॅस व प्रमोशनशी लिंक करणे, संलग्नित महाविद्यालयांचे नॅक करणे तसेच विद्यापीठाने जास्तीत जास्त महाविद्यालयांना स्वायत्तता देण्यासाठी संस्थाचालक व प्राचार्यांची संयुक्त सभा घ्यावी, असे डॉ. येवले यांनी सूचित केले. नॅक प्रक्रिया सुलभ झाली असून शासनाने त्यासाठी लागणारे शुल्क देखील कमी केल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. नॅक मूल्यांकनात सी ग्रेड असलेले महाविद्यालये देखील स्वायत्तता घेवू शकतात अशी माहिती सुध्दा त्यांनी यावेळी दिली.

दुपारच्या सत्रात बी प्लस व त्यावरील नामांकनप्राप्त महाविद्यालयांच्या प्राचार्यांची सभा झाली. सभेत 25 महाविद्यालयांचे प्राचार्य उपस्थित होते. सभेत स्वायत्तता घेण्यासाठी येणा-या समस्यांवर समितीचे अध्यक्ष डॉ. प्रमोद येवले यांनी मार्गदर्शन केले. यावेळी प्राचार्यांनी उपस्थित केलेल्या शंकांचे समितीने योग्यरितीने निरसन केले. महाविद्यालयांमध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेसाठी नॅक करणे किती आवश्यक आहे, हे देखील समितीच्या अध्यक्षांनी उपस्थितांना पटवून दिले. कौशल्याधारित अभ्यासक्रमाच्या माध्यमातून महाविद्यालये आपली आर्थिक बाजू सक्षम करू शकतील. दिडशे संस्था अशा आहेत, ज्या वेगवेगळ्या प्रकारचा फंड देतात त्याची माहिती देवून याबाबत समितीच्या अध्यक्षांनी तामिळनाडूमधील महाविद्यालये कशी आर्थिकदृष्टज संपन्न झालीत, त्याची उदाहरणे देऊन ती बाब पटवून दिली.

विद्यापीठाचे आयक्यूएसी संचालक डॉ. संजय वाघुळे यांनी पीपीटीच्या माध्यमातून विविध विषयांबाबत विद्यापीठाची सद्यस्थिती विषद केली. यावेळी समितीने विद्यापीठात उपलब्ध असलेले कन्सलटन्सी व आय.पी..एल. पॉलीसी वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यावर व जे महाविद्यालय नॅक करीत नाही, त्यांना पुढील संलग्निकरण देवू नये अशा सूचना दिल्यात.

कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी समितीकडून मिळालेल्या सूचनांनुसार अंमलबजावणी करण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले व विद्यापीठाच्यावतीने सर्वांचे आभार मानले. सभेला नोडल अधिकारी डॉ. सुलभा पाटील, गुणवत्ता हमी कक्ष समिती सदस्य डॉ. स्वाती शेरेकर, डॉ.राहुल म्हात्रे, मुंबई, डॉ. पांडुरंग बरकले, डॉ. भालचंद्र वायकर, संभाजीनगर उपस्थित होते. सभा आयोजनासाठी विकास विभाग व इन्क्युबेशन सेंटरच्या अधिकारी व कर्मचा-यांनी परिश्रम घेतलेत.

# आकोल्यातून ५०० कार्यकर्त्यांचा राजीनामा



■ महासागर प्रतिनिधी
अकोला, दि. २८ :

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय पक्षांकडून उमेदवारांच्या नावांची घोषणा केली जात आहे. या प्रक्रियेत मात्र अनेक इच्छुक उमेदवारांना संधी दिली जात नाही, तर काही ठिकाणी मित्र पक्षासाठी जागा सोडली जात असल्याने महायुती तसेच महाविकास आघाडी पक्षातील कार्यकर्ते नाराज असल्याचे समोर येत आहे. असेच अकोला जिल्ह्यातील मूतीर्जापूर येथे मोठी घडामोड घडत आहे. भाजपचे जवळपास 500 पदाधिकाऱ्यांनी राजीनामा दिल्याची चर्चा सुरू आहे. भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे हे आज नांदेड जिल्ह्याच्या दौऱ्यावर असल्याने मूतीर्जापूरच्या भाजप पदाधिकाऱ्यांचा मोठा ताफा नांदेडच्या दिशेला रवाना झाल्याची माहिती आहे. दरम्यान, शनिवारी रात्रीच जवळपास 300 पेक्षा अधिक कार्यकर्त्यांनी राजीनामे पाठवले होते. त्यानंतर रविवारी मतदारसंघातील बाशीर्टाकळी तालुक्यातील 200 पेक्षा जास्त कार्यकर्त्यांनी देखील राजीनामे पाठवले आहेत. भाजपच्या दुसऱ्या यादीतही मूतीर्जापूर येथील भाजपचे आमदार हरिष पिंपळे यांचे तिकीट कापले जाण्याची शक्यता असल्याने भाजप पक्षातील कार्यकर्ते नाराज असल्याचे बोलले जात आहे.

या विरोधात आज बाशीर्टाकळी तालूक्यातील शेकडो भाजप पदाधिकाऱ्यांनी राजीनाम्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये भाजपाचे तालुकाध्यक्ष, शहर प्रमुख, बूथ प्रमुख, शक्ती केंद्रप्रमुख या पदाधिकाऱ्यांचा समावेश आहे. विधानसभा निवडणुकीच्या पूर्वी महायुतीमधील घटक पक्षांमधील असलेला नाराजीचा सूर निवडणुकीत काय परिणाम करेल यावर आता लक्ष असणार आहे. महायुतीमधील उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या राष्ट्रवादी पक्षाला देखील भाजप पक्षातील अनेक नेते व कार्यकर्त्यांचा विरोध आहे. अशा स्थितीत महायुती समोर निवडणुकीत मोठे आव्हान उभे असणार असल्याचे बोलले जात आहे.

# अपघातात तीन जण गंभीर

■ महासागर प्रतिनिधी
वणी, दि. २८ :

ट्रकने दुचाकीला मागून जोरदार धडक दिल्याने झालेल्या भीषण अपघातात एकाच कुटुंबातील तीन जण गंभीर जखमी झाले. यातील दोघांची प्रकृती चिंताजनक असून तिघांनाही पुढील उपचारासाठी चंद्रपूर येथे हलवण्यात आले आहे. हा अपघात शनिवारी २६ ऑक्टोबर रोजी रात्री ८.३० वाजेच्या सुमारास वणी वरोरा मार्गावरील मलिक चिकन सेंटर पासून काही अंतरावर घडला. या अपघातात पती, पत्नी व मुलगी असेतिघे जखमी झाले. मलिक चिकन सेंटर जवळच पोलिस चेक पोस्ट उभारण्यात आले आहे. त्यामुळे अपघात होताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन जखमींना रुग्णालयात हलविले.

या अपघातात महिलेच्या पायाला, तर मुलीच्या हाताला गंभीर दुखापत झाली आहे. वणी येथे कार्यक्रमासाठी आलेले हे कुटुंबं कार्यक्रम आटपून वरोरा येथे परतत होते. दरम्यान वणी वरोरा मार्गावरील मलिक चिकन सेंटर जवळ त्यांच्या दुचाकीला मागून भरधाव येणाऱ्या ट्रकने जोरदार धडक दिली.

# चतुर्वेदेश्वर आश्रमाला रुद्र सप्तशती मंडळाची आर्थिक मदत



■ महासागर प्रतिनिधी
अकोला दि. २८ :

सनातन भारतीय धर्म आणि वेद यांचे संस्कार आजच्या पिढीत कायम ठेवण्यासाठी व तशी संस्कारित पिढी घडवण्यासाठी राष्ट्रीय आणि धर्म कार्य गेल्या अनेक वर्षांपासून सावरगाव येथील चतुर्वेदेश्वर आश्रमात केले जात आहे. त्या आश्रमाला अकोला येथील रुद्र सप्तशती मंडळाने ६५ हजार रुपए देणगी दिली.

रुद्र सप्तशती मंडळातर्फे दरवर्षी श्रावण महिन्यात भाविकांकडे रुद्र अभिषेक करण्यात येतो. या रुद्र अभिषेकच्या माध्यमातून रक्कम जमा होते. यावर्षी अभिषेकच्या माध्यमातून जमा झालेली ६५ हजार रुपये सावरगाव येथील चतुर्वेदेश्वर आश्रमास देण्यात आली. चतुर्वेदेश्वर आश्रमात विद्यार्थी वेदशास्त्र शिकत आहेत.

चतुर्वेदेश्वर आश्रम सभामंडपात आश्रमातील विद्यार्थी, चार वेदांची व अथर्ववेदाचार्य देशिक कस्तुरे यांना रुद्र सप्तशती मंडळाचे ज्येष्ठ कार्यकर्ते सुधाकर जकाते यांच्या हस्ते ६५ हजार राशी समर्पण करण्यात आली व सत्कार करण्यात आला. चतुर्वेदेश्वर आश्रमाप्रती असलेल्या ऋणानुबंध विषयी माहिती सुरेश आयाचित यांनी दिली. सुधाकर जकाते यांनी आश्रमातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

# गोवंश तस्कर अटकेत; ५२ जनावरांची सुटका

■ महासागर प्रतिनिधी
यवतमाळ दि. २८ :

गोवंश तस्करी करणाऱ्यांच्या मुसक्या आवळत पोलिसांनी ५२ जनावरांची सुटका केली.


ही कारवाई पांढरकवडा पोलिसांनी शुक्रवारी केली. याप्रकरणी पोलिस सुत्रांकडून प्राप्त माहितीनूसार, नागपूरमार्गे आदिलाबादकडे ट्रक क्रमांक आरजे-२७-जीई-५५५४ मध्ये गोवंशीय जनावरे भरून अवैधरित्या वाहतूक केली जात होती. याबाबतची माहिती पांढरकवडा पोलिस ठाण्यातील अधिकारी, कर्मचाऱ्यांना मिळाली.

दरम्यान, पोलिसांनी मोहम्मद जाकीर मोहम्मद जहीर (४६) रा. भोपाल, उमर खान मुबारक खान (२८) रा. विदीशा, मोहम्मद अस्लम मोहम्मद असगर (४२) रा. भोपाल, सिध्दी खान रईस खान (३१) रा. पवई, गाडी व जनावर मालक शरीफ खान रा. कटनी, अमीर मुनीर मल्नस उर्फ भुऱ्या रा. पांढरकवडा यांच्याविरूध्द गुन्हा दाखल केला आहे. सेच ३१ लाख ९५ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. तसेच जनावरांना गोरक्षणात पाठविण्यात आले.

# नियमांचे पालन न केल्यास फटाका विक्रेत्यांवर करणार कडक कारवाई

■ महासागर प्रतिनिधी
संग्रामपूर, दि. २८ :

सर्वात मोठा दिवाळीचा सण अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. दिवाळीच्या दिवसात फराळ, नवीन कपडे, विविध प्रकारच्या खरेदी सोबतच फटाक्यांच्या खरेदीला सुद्धा विशेष महत्त्व असते. त्या अनुषंगाने तालुक्यात मागील वर्षी प्रमाणे याही वर्षी २४ फटाके विक्री करणाऱ्यांनी आपल्याकडील परवान्याचे नूतनीकरण केले आहे. आता फटाके विक्री करणाऱ्यांकडून दुकाने थाटली जाणार आहेत. परंतु प्रशासनाच्या नियमानुसार सर्व नियमाचे काटेकोर पालन करूनच फटाके विक्री करणे आवश्यक आहे.



शहरासह तालुक्यातील किरकोळ फटाका विक्रेत्यांसह विविध ठिकाणी छोटी मोठी दुकाने थाटून विना परवानगी फटाके शहरासह तालुक्यातील आठवडी बाजारात विक्री करणाऱ्यांवर प्रशासकीय यंत्रणेकडून थेट कारवाई केली जाणार आहे. तहसील कार्यालयाच्या वतीने फटाके विक्री करणाऱ्या परवाना धारकांचा परवाना दरवर्षी तहसीलदारांच्या मार्फत नूतनीकरण करण्यात येतो. परवानगी असलेल्या फटाक्यांनाच विक्री करण्यास परवानगी दिली जाते. फटाक्याच्या परवान्यासाठी विविध विभागांची मान्यता घ्यावी लागते. जिल्ह्याच्या ठिकाणी नगरपरिषद, नगरपंचायत, ग्रामपंचायत, अग्निशमन विभागाचा परवाना लागतो, तसेच पोलिसांचे आणि इतर ना हरकत प्रमाणपत्र हे संबंधितांना द्यावे लागतात. त्यानुसार फटाके विक्री करणारे व्यापारीसुद्धा सर्व तयारी करून प्रशासनास सहकार्य करीत असतात. एखाद्या ठिकाणी डेसिबलची मयार्दा ओलांडली गेल्यास त्या विरोधात स्थानिक पोलिस ठाण्याच्या माध्यमातून तसेच प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या माध्यमातून कारवाई केली जाते. न्यायालयाच्या आदेशानुसार ही कारवाई होत असते. यासाठी नियमाच्या अधीन राहून सण उत्सव साजरे करून प्रदूषण टाळावे, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

फटाके विक्रीसाठी परवाना आवश्यक फटाका विक्रीसाठी परवाना आवश्यक आहे. फटाके विक्री करायची असल्यास त्यासाठी प्रशासनाकडून काढलेला परवाना असणे आवश्यक आहे, अन्यथा विनापरवाना फटाका विक्री केल्यास दंडात्मक कारवाई होईल, शहरासह तालुक्यातील आठवडी बाजारात बऱ्यापैकी अवैधरीत्या फटाक्यांचे दुकाने थाटली जातात. परंतु नगर पंचायत तसेच तालुका प्रशासनाकडून यावर कोणत्याच प्रकारची कारवाई केल्या जात नाही. यावर्षी कारवाई होणार की नाही की याहीवर्षी सर्व फटाके पाहून संबंधित विभाग गप्पच राहणार, असा प्रश्न उपस्थित करण्यात येत आहे.

**Change Of Name**

MY OLD NAME WAS **SAVITA UKEY**. NOW MY NEW NAME IS **SARITA BHAGWAN UKEY.**
**ADD :** PLOT NO 42 BEHIND DAHAN GHAT SENAPATI NAGAR DIGHORI HUDKESHWAR KHURD NAGPUR MAHARASHTRA 440034

MY OLD NAME WAS **SWAIMA MOAZZAM / HUSAIN SWAIMA MOAZZAM.** NOW MY NEW NAME IS **SWAIMA JAWWAD KHAN.**
**ADD :** PLOT NO 6 AHBAB COLONY KATOL ROAD,NAGPUR 440013

MY OLD NAME WAS **YAKUTA BANO TAHER.** NOW MY NEW NAME IS **YAKUTA TAHER PITHAWALA.**
**ADD :** MUDLIAR LAYOUT,AADHAR APARTMENT, SHANTI NAGAR, NAGPUR 440002

**Format C-7**

(for political parties to publish in the newspapers, social media platforms & website of the party)

Information regarding individuals with pending criminal cases, who have been selected as candidates, along with the reasons for such selection, as also as to why other individuals without criminal antecedents could not be selected as candidates.

(As per the Commission's directions issued in pursuance of the Order dated 13.02.2020 of the Hon'ble Supreme Court in contempt petition(C) no. 2192 of 2018 in WP(C) no. 536 of 2011)

**Name of Political Party : Bharatiya Janata Party**
***Name of the Election : Maharashtra Legislative Assembly-2024**
**Name of State/UT : Maharashtra**
**(1) Name of the Constituency : 56 - Nagpur West**
**Name of the candidate : SUDHAKAR VITTHALRAO KOHALE**

| Sl. No. | | | |
|---|---|---|---|
| | | **Criminal antecedents** | |
| 1. | a. | Nature of the offences | 1) U/s. 125A Representation of People Act 1951, R W 199 of IPC with Sadar Police Station.<br>2) U/s. 415, 417, 471, 467, 120B, 34 of IPC with Hudkewshar Police Station.<br>3) U/s. 125A Representation of People Act 1951, R W 199 of IPC with Sadar Police Station. |
| | b. | Case no. | 1) CC No. 154/2018<br>2) Rev. No. 377/2017<br>3) CC No. 2249/2017 |
| | c. | Name of the Court | 1) J.M.F.C. Court, Nagpur.<br>2) District Session Court, Nagpur.<br>3) J.M.F.C. Court, Nagpur. |
| | d. | Whether charges have been framed or not (Yes/No) | No |
| | e. | Date of conviction, if any | NIL |
| | f. | Details of punishment undergone, if any | NIL |
| | g. | Any other information required to be given | The Cases are still under consideration before Hon'ble Court. |
| 2. | | The reasons for the selection of the candidate. Selection shall be with reference to the qualifications, achievements and merit of the candidate, and not mere "winnability" at the polls (not more than 100 words) | Candidate **Sudhakar Vitthalrao Kohale** has been Senior Legislator. He has very strong administrative capacity. Looking at his experience he has been chosen. |
| 3. | | Reasons as to why other individuals without criminal antecedents could not be selected as candidates (not more than 100 words) | All other names who were, aspirants did not have any relevant experience in public life to holds such senior post. |

**(2) Name of the Constituency : 56 - Nagpur West**
**Name of the candidate : SUDHAKAR VITTHALRAO KOHALE** ...................... and so on

* In the case of election to Council of States or States or Election to Legislative Council bye MLAs, mention the election concerned in place of name of Constituency.

Signature of office bearer of the Political Party
Name and designation...
**Chandrashekhar Bawankule**
**President,**
**Bharatiya Janata Party, Maharashtra**

**Date : 28/10/2024**
**Place : Mumbai**

# जम्मू-काश्मीर पुन्हा स्वतंत्र राज्य होणार!

जम्मू-काश्मीरला पूर्ण राज्याचा दर्जा बहाल करण्यासाठी केंद्रात करार झाला आहे. त्याचबरोबर लडाख हा केंद्रशासित प्रदेश राहील. नोव्हेंबरच्या शेवटच्या आठवड्यात सुरू होणाऱ्या संसदेच्या हिवाळी अधिवेशनात यासंबंधीचा प्रस्ताव आणला जाईल. राज्याचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी 23 ऑक्टोबरला गृहमंत्री अमित शहा आणि 24 ऑक्टोबरला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. यादरम्यान ओमर यांनी पूर्ण राज्याचा दर्जा बहाल करण्याची विनंती केली होती. त्यांना यंदा राज्य पूर्ववत करण्याचे आश्वासन मिळाले होते.

------------------

2019 मध्ये, जेव्हा कलम 370 आणि 35अ हटवण्यात आले, तेव्हा जम्मू-काश्मीर आणि लडाख हे दोन केंद्रशासित प्रदेश बनवण्यात आले. राज्यातील परिस्थिती सामान्य झाल्यावर पूर्ण राज्याचा दर्जा बहाल करण्याचे आश्वासन सरकारने त्यावेळी दिले होते. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीतही भाजपने याचीच पुनरावृत्ती केली होती.

निवडणुकीनंतर स्थापन झालेल्या सरकारच्या पहिल्या मंत्रिमंडळ बैठकीत राज्याचा दर्जा बहाल करण्याचा प्रस्ताव मंजूर करून लेफ्टनंट गव्हर्नर यांच्याकडे पाठवण्यात आला. 19 ऑक्टोबरला प्रस्ताव मंजूर केल्यानंतर एलजी मनोज सिन्हा यांनी तो गृह मंत्रालयाकडे पाठवला. ओमर अब्दुल्ला सरकारने 17 ऑक्टोबर रोजी मंत्रिमंडळाच्या पहिल्या बैठकीत जम्मू-काश्मीरला राज्याचा दर्जा देण्याचा प्रस्ताव मंजूर केला होता.

**कायदेशीर प्रक्रिया**

जम्मू आणि काश्मीर राज्याची जम्मू आणि काश्मीर पुनर्रचना कायदा, 2019 अंतर्गत दोन केंद्रशासित प्रदेशांमध्ये पुनर्रचना करण्यात आली. त्यामुळे पूर्ण राज्याचा दर्जा मिळवण्यासाठी संसदेत कायदा करून पुनर्रचना कायद्यात बदल करावे लागतील.

हे बदल घटनेच्या कलम 3 आणि 4 अंतर्गत केले जातील.

राज्याचा दर्जा देण्यासाठी, नवीन कायदेशीर बदलांना लोकसभा आणि राज्यसभेत मंजुरी आवश्यक असेल, म्हणजेच या प्रस्तावाला संसदेची मंजुरी मिळणे आवश्यक आहे. मंजुरीनंतर तो राष्ट्रपतींकडे पाठवला जाईल. त्यांच्या मंजुरीनंतर, राष्ट्रपतींनी या कायदेशीर बदलाची अधिसूचना जारी केल्यापासून जम्मू-काश्मीरला पूर्ण राज्याचा दर्जा मिळेल.

**पूर्ण राज्याचा दर्जा आणि बदल**

पोलिस आणि कायदा सुव्यवस्थेची जबाबदारी राज्य सरकारवर येणार आहे. पोलिसांवर सरकारचे थेट नियंत्रण असेल.

जमीन, महसूल आणि पोलिसांशी संबंधित विषयांवर कायदे करण्याचे अधिकारही राज्य सरकारला मिळणार आहेत.



मग राज्यपाल सरकार चालवण्यात हस्तक्षेप करणार नाहीत.

आर्थिक मदतीसाठी केंद्रावरील अवलंबित्व संपेल. वित्त आयोगाकडून आर्थिक मदत दिली जाईल.

राज्य विधानसभेला सार्वजनिक सुव्यवस्थेच्या आणि समवर्ती सूचीच्या बाबतीत कायदे करण्याचा अधिकार असेल.

सरकारने कोणतेही आर्थिक विधेयक मांडल्यास त्यासाठी राज्यपालांची मंजुरी घेण्याची गरज भासणार नाही.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग आणि अखिल भारतीय सेवांवर राज्य सरकारचे पूर्ण नियंत्रण असेल. म्हणजेच राज्यातील अधिकाऱ्यांच्या बदल्या आणि पदस्थापना राज्य सरकारच्या नियंत्रणाप्रमाणे होतील, त्यावर उपराज्यपालांचे नियंत्रण राहणार नाही.

कलम 286, 287, 288 आणि 304 मध्ये बदल केल्याने राज्य सरकारला व्यापार, कर आणि वाणिज्य विषयक सर्व अधिकार प्राप्त होतील.

केंद्रशासित प्रदेशात 10% आमदारांना राज्याचा दर्जा बहाल केल्यावर मंत्र्यांच्या संख्येवरील हे निर्बंधही संपुष्टात येतील आणि 15% आमदारांना मंत्री बनवता येईल.

याशिवाय तुरुंगातील कैद्यांची सुटका आणि नॅशनल कॉन्फरन्सच्या इतर निवडणूक आश्वासनांची पूर्तता करण्यासाठी राज्य सरकारला केंद्रापेक्षा अधिक अधिकार मिळणार आहेत.

जम्मू-काश्मीरला राज्याचा दर्जा देण्याची मागणी करणारी याचिकाही सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली आहे. जम्मू-काश्मीर केंद्रशासित प्रदेशाला पूर्ण राज्याचा दर्जा देण्याची मागणी करणाऱ्या याचिकेवर दोन महिन्यांत सुनावणी घेण्याचे सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी मान्य केले.

जहूर अहमद भट आणि खुर्शीद अहमद मलिक यांच्या वतीने वकील गोपाल शंकर नारायण यांनी ही याचिका दाखल केली आहे. आपण हे ऐकू असे सरन्यायाधिश चंद्रचूड यांनी सांगितले होते.

कलम 370 हटवल्यानंतर गेल्या महिन्यात राज्यात पहिल्यांदाच विधानसभा निवडणुका झाल्या. तीन टप्प्यात झालेल्या निवडणुकांचे निकाल ८ ऑक्टोबरला आले. यामध्ये नॅशनल कॉन्फरन्स हा सर्वात मोठा पक्ष म्हणून पुढे आला होता. पक्षाला 42 जागा मिळाल्या होत्या. एनसीचा मित्रपक्ष काँग्रेसने 6 जागा जिंकल्या आणि सीपीआय (एम) एक जागा जिंकली.

29 जागांसह भाजप दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष ठरला आहे. त्याचवेळी 2014 च्या विधानसभा निवडणुकीत सर्वात मोठा पक्ष ठरलेल्या पीडीपीला केवळ 3 जागा मिळाल्या. पक्षप्रमुख मेहबूबा मुफ्ती यांची कन्या इल्तिजा मुफ्ती यांचाही बिजबेहरा मतदारसंघातून पराभव झाला आहे. गेल्या निवडणुकीत पक्षाला 28 जागा मिळाल्या होत्या.

**देशात प्रदूषण वाढले**

दिवाळीच्या अवघ्या चार दिवस आधी देशभरातील प्रदूषणाची पातळी धोकादायक पातळीवर पोहोचली आहे. अदकल्ल नुसार, रविवारी सकाळी 10 वाजेपर्यंत देशातील 11 शहरांची अदक पातळी 300 च्या वर नोंदवण्यात आली होती. यामध्ये भिवाडी, दिल्ली, नोएडा, मेरठ, गाझियाबाद, जयपूर, बुलंदशहर, अमृतसर, अलीगढ, सोनीपत आणि फरिदाबाद या शहरांचा समावेश आहे.

610 अदक सह राजस्थानमधील भिवाडी सर्वात धोकादायक स्थितीत होते. दिल्ली देखील गॅस चेंबर बनले आहे, येथे रविवारी सकाळी आनंद विहारमध्ये 400 च्या वर AQI नोंदवण्यात आला.

आग्रामध्येही प्रदूषण आणि धुक्यामुळे ताजमहाल अस्पष्ट दिसत होता. मुंबईतील मरीन ड्राइव्हवरही सकाळी धुक्याचा थर पाहायला मिळाला.

दिवाळीपूर्वी दिल्लीतील वायू प्रदूषण नियंत्रणात ठेवण्यासाठी दिल्ली प्रदूषण नियंत्रण समितीने 1 जानेवारी 2025 पर्यंत फटाक्यांवर बंदी घातली आहे. शासनाच्या आदेशानुसार फटाके बनवणे, साठवणे, विक्री करणे आणि वापरणे यावर बंदी घालण्यात आली आहे.

एवढेच नाही तर फटाक्यांच्या ऑनलाइन वितरणावरही बंदी घालण्यात येणार आहे. यामध्ये हरित फटाक्यांचाही समावेश आहे. या बंदीची कडक अंमलबजावणी करण्याची जबाबदारी दिल्ली पोलिसांवर सोपवण्यात आली आहे. दिल्ली पोलीस आपला अहवाल दररोज डीपीसीसीला सादर करतील.

दिल्लीच्या एअर क्वालिटी इंडेक्सने २०० ओलांडल्यानंतर दिल्ली एनसीआरमध्ये ग्रेप-१ लागू करण्यात आला. याअंतर्गत हॉटेल आणि रेस्टॉरंटमध्ये कोळसा आणि सरपण वापरण्यावर बंदी घालण्यात आली आहे. कमिशन ऑफ एअर क्वालिटी मॅनेजमेंटने एजन्सींना जुन्या पेट्रोल आणि डिझेल वाहनांच्या ऑपरेशनवर कठोरपणे निरीक्षण करण्याचे आदेश दिले आहेत.

**AQI म्हणजे काय आणि त्याची उच्च पातळी धोकादायक का आहे?**

AQI हा एक प्रकारचा थर्मामीटर आहे. हे तापमानाऐवजी प्रदूषण मोजण्याचे काम करते. या स्केलद्वारे, हवेत उड (कार्बन डायऑक्साइड), ओझोन, NO2 (नायट्रोजन डायऑक्साइड), ढट 2.5 (पार्टिक्युलेट मॅटर) आणि PM 10 प्रदूषकांचे प्रमाण तपासले जाते आणि शून्य ते 500 पर्यंत रीडिंगमध्ये दाखवले जाते.

हवेतील प्रदूषकांचे प्रमाण जितके जास्त असेल तितकी अदक पातळी जास्त असेल. आणि अदक जितका जास्त तितकी हवा जास्त धोकादायक. जरी 200 ते 300 मधील अदकदेखील वाईट मानला जातो, परंतु परिस्थिती अशी आहे की राजस्थान, हरियाणा, दिल्ली आणि उत्तर प्रदेशातील अनेक शहरांमध्ये तो 300 च्या वर गेला आहे.

●●●●●●

---

## जागतिक इंटरनेट दिन

आजचे युग हे इंटरनेटचे युग आहे. इंटरनेट आज सर्वांच्या जीवनातील अविभाज्य घटक बनला आहे. इंटरनेट शिवाय कोणी राहू शकत नाही एकवेळ माणूस अन्नापाण्याशिवाय राहील पण इंटरनेटशिवाय नाही इतकी इंटरनेट आज जीवनावश्यक गोष्ट बनली आहे.

आपला इंटरनेट पॅक अचानक संपला तर आपली काय अवस्था होते हे तपासून पहा. असं कोणतेच क्षेत्र नाही जिथे इंटरनेटचा वापर होत नाही सर्वच क्षेत्रात इंटरनेटचा वापर केला जातो म्हणूनच इंटरनेट आपल्या जीवनातील अविभाज्य भाग बनला आहे. भारतात १९९५ च्या सुमारास इंटरनेट उपलब्ध झालं मात्र असलं तरी त्याच्या कितीतरी आधी अमेरिकेत आणि युरोपात इंटरनेटचा वापर केला जात होता.

२९ ऑक्टोबर १९६९ रोजी इंटरनेटवरचा पहिला संदेश पाठवला गेला म्हणूनच २९ ऑक्टोबर हा दिवस जागतिक इंटरनेट दिवस म्हणून मानला जातो . इंटरनेटवर पहिला संदेश पाठवला त्याला आज बरोबर ५५ वर्ष पूर्ण झाली. या ५५ वर्षात इंटरनेटमुळे जगात अनेक क्रांतिकारी बदल झाले मात्र इंटरनेटवर पहिला संदेश कसा पाठवला गेला हे पाहणे खूप मनोरंजक आहे. १९६० चा दशकात अमेरिका आणि रशिया यांच्यात शीतयुद्ध चालू होते अमेरिकन सैन्याला इंटरनेट व्यवस्था सारखी गुप्त व्यवस्था संदेशवहनासाठी हवी होती. अशी यंत्रणा स्थापन करण्यासाठी अमेरिकन संरक्षण खात्याने एका संशोधन प्रकल्पाला मोठ अर्थसहाय्य देऊन अमेरिकेतील काही विद्यापीठाकडे त्या संशोधनाचे काम सोपवल. या प्रकल्पासाठी एकूण चार संगणक अमेरिकेतील चार विद्यापीठात जोडण्यात आले. त्या चार संगणकातच जगातील पहिलं इंटरनेट होत. या चार संगणकांपैकी एक होता कोलिफॉर्निया लॉस एंजेलिस विद्यापीठात, दुसरा होता स्टॅनफोर्ड विद्यापीठात तिसरा होता सांता बार्बरा विद्यापीठात तर चौथा होता उता विद्यापीठात. एका संगणकातून दिला जाणारा संदेश इंटरनेटद्वारे दुसऱ्या संगणकात पोहचतो असे संशोधन या प्रकल्पातील तज्ज्ञांनी केले होते त्याची चाचणी या चार संगणकाद्वारे केली जाणार होती. अर्थात त्याकाळी आजच्या इतके प्रगत तंत्रज्ञान नव्हते. संगणकाचे मॉनिटर तर हिरव्याजर्द अक्षरांनी चमकणारे असत.

कॉलिफॉर्नियामध्ये चार्ली क्लीने या संगणकप्रणाली निर्मात्याने एका संगणकावरून दुसऱ्या संगणकाला एकेक्ट्रोनिक संदेश पाठवला. पहिल्या वेळी पाठवलेल्या log in शब्दापैकी lo शब्द पोहचल्यावर सिस्टीम फेल झाली. पुढील अक्षरे पोहचू शकली नाहीत मात्र अर्धवट का होईना संदेश पोहचला ही बाब दूरसंचार आणि तंत्रज्ञान क्षेत्रात क्रांती घडवणारी ठरली. हा दिवस माहिती आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील सुवर्ण दिन ठरला. म्हणूनच २९ ऑक्टोबर हा दिवस संपूर्ण जगात जागतिक इंटरनेटदिन म्हणून साजरा केला जातो.



**श्याम ठाणेदार**
**दौंड. जिल्हा पुणे.**
**९९२२५४६२९५**

●●●●●

## कारल्यात अनेक औषधी गुणधर्म



कारले खाणे आरोग्यासाठी फायदेशीर म्हटले जाते. परंतु अनेकांना कडू असल्यामुळे कारले आवडत नाही. कारल्यात अनेक औषधी गुणधर्म आहे. परंतु जास्त प्रमाणात कारले खाल्ले तर त्याचे विपरीत परिणाम होऊ शकतात,

टाईप 1 डायबिटीज असलेल्या लोकांनी कारल्याच्या भाजी किंवा कारल्याचा रस पिणे चांगले नाही. कारण यामुळे रक्तातील साखरेची पातळी अचानक कमी होऊ शकते. ज्यामुळे अशक्तपणा आणि चक्कर येण्याची तक्रार होऊ शकते.

गरोदर महिलांनीही कारल्याचे सेवन टाळावे. कारण त्याचा गर्भाशयावर परिणाम होऊ शकतो. तसेच गभार्तील बाळाच्या आरोग्यावर नकारात्मक परिणाम होतो.

कारल्यामध्ये भरपूर प्रमाणात ऑक्सलेट असते, त्यामुळे जे लोक त्याचे सेवन करतात त्यांना किडनी स्टोनची समस्या असू शकते. तसेच कारल्यामुळे किडनीमध्ये विषारीपणा वाढतो.

कारल्यातील कडूपणा तुम्हाला कमी करायचा असेल, तसेच त्यामुळे होणारे नुकसान टाळायचे असेल तर हा एक उपाय आहे. तुम्हाला ते नीट शिजवावे लागेल.

शिजवण्याआधी कारले नीट धुवून घ्या. त्यातील बिया काढून टाका. कारण कारल्याच्या बिया खूप कडू असतात. जर तुम्हाला हवे असेल तर तुम्ही कारल्याची भाजी करताना त्यात जास्त कांद्याचा वापर करु शकतात.



## संदुक आणि वळकटी

बोलता बोलता सहज मी
दिवाळीचा विषय काढला
एकदम माझ्या मित्राचा
चेहरा पांढरा पडला..

तो म्हणाला दिवाळी आली की
हल्ली धड धड होतं
जुनं सारं वैभव आठवून
रडकुंडीला येतं..

चार दिवसाच्या सुट्टीत आता
कसं होईल माझं
एवढ्या मोठ्या वेळेचं
उचलेल का ओझं?

मी म्हटलं अरे वेड्या
असं काय म्हणतोस
सलग सुट्टी मिळून सुद्धा
का बरं कण्हतोस?

काय सांगू मित्रा आम्ही
चौघ बहीण भाऊ
कुणीच कुणाला बोलत नाही
मी कुठे जाऊ?

आता कुणी कुणाकडे
जात येत नाही
आम्हालाही दोन दिवस
कुणीच बोलावीत नाही..

चार दिवस कसे जातील
मलाच प्रश्न पडतो
लहानपणीचे फोटो पाहून
मी एकटाच रडतो...

पूर्वीच्या काळी नातेवाईक
बरेच गरीब होते
तरीही ते एकमेकाकडे
जात येत होते ..

कुणाकडे गेल्या नंतर
आतून स्वागत व्हायचं
सारं काम साऱ्यानी
मिळून मिसळून करायचं..

सुबत्ता फार नव्हती
पण वृत्ती चांगली होती
गरिबी असून सुद्धा
खूप मजा होती..

मुरमुऱ्याच्या चिवड्या मधे
एखादाच शेंगदाणा भेटायचा
त्याप्रसंगी आनंद मात्र
आभाळा एवढा असायचा..

लाल, हिरव्या रंगाचे
वासाचे तेल असायचे
अर्ध्या वाटी खोबऱ्याच्या तेलात
बुडाला जाऊन बसायचे..

उत्साह आणि आनंद मात्र
काठोकाठ असायचा
सख्खे असो, चुलत असो
वाडा गच्च दिसायचा..

चपला नव्हत्या बूट नव्हते
नव्हते कपडे धड
तरीही जगण्याची
मोठी धडपड..

सारे झालेत श्रीमंत
पण वाडे गेले पडून
नाते गोते प्रेम माया
विमानात गेले उडून..

घरा घरात दिसतो आता
सुबत्तेचा पूर
तरी आहे मना मनात
चुली सारखा धूर..

पाहुण्यांचे येणे जाणे
आता संपून गेले
दसरा आणि दिवाळीतले
आनंदी क्षण गेले...

श्राद्ध, पक्ष व्हावेत तसे
मोठे सण असतात
फ्लॅट आणि बंगल्या मधे
दोन चार माणसं दिसतात..

प्रवासाची सुटकेस आता
अडगळीला पडली
त्या दिवशी माझ्याजवळ
धाय मोकलून रडली..

हॅंडल तुटलं होतं तरी
सुतळी बांधली होती
लहानपणी तुमची मला
खूप सोबत होती..

सुटकेस म्हणली सर मला
पाहुण्याकडे नेत जा
कमीत कमी दिवाळीत तरी
माझा वापर करीत जा..

सुटकेसचं बोलणं ऐकून
माझं ही काळीज तुटलं
म्हटलं, बाई, माणसाचं
आता नशीब फुटलं..

म्हणून म्हणतो बाबांनो
अहंकार सोडा
बहीण, भाऊ, काका, काकू,
पुन्हा नाती जोडा..

' संदुक ' आणि ' वळकटीचे '
स्मरण आपण करू
दिवाळीला जाण्यासाठी
पुन्हा सुटकेस भरू..!

# स्वतः झाडू घेऊन कन्नमवार मुंबईच्या रस्त्यांवर उतरले

(मागील अंकावरून पुढे)

------------------



उत्तरार्ध

दादासाहेबांच्या काळात मुंबई महापालिकेच्या सफाई कामगारांचा एक मोठा संप झाला. या कामगारांचे एक शिष्टमंडळ जॉर्ज फर्नांडिस यांच्या नेतृत्वात मुख्यमंत्री कन्नमवार यांच्या भेटीला आले. चर्चा सुरू असताना एक कामगार नेता म्हणाला, आमच्या बहुतांश मागण्या मागच्या मुख्यमंत्री म्हणजे यशवंतरावांनी तत्वतः मान्य केल्यात, त्यामुळे तुम्ही त्या मंजूर करा.

त्यावर कन्नमवार त्या नेत्याला थांबवत म्हणाले, आता यशवंतराव नव्हे तर मी मुख्यमंत्री आहे. यामुळे शिष्टमंडळ चपापले आणि चर्चेच्या वाटाघाटी सुरू झाल्या.

हा संप मोडून काढण्यासाठी दादासाहेब स्वतः आपल्या कार्यकर्त्यांसह मुंबईच्या रस्त्यावर झाडू घेऊन उतरले. ते रोज एका नव्या वस्तीत जाऊन रस्ते झाडत. त्यांच्या या गांधीगिरीचा परिणाम असा झाला की, संकोचलेले सफाई कामगारांनीच जॉर्ज फर्नांडीस यांच्याकडे जाऊन संप मागे घेण्याची विनंती केली आणि हा संप सुटला.

**कन्नमवारांचे हिरे प्रकरण उद्या फोडणार!**

मारोतरावांनी सत्तासूत्रे हाती घेऊन जेमतेम एक वर्ष होत होते. तेव्हा त्यांच्याविरोधात गुप्त हालचाली सुरू झाल्या. त्याकाळी आचार्य अत्रे यांचे मराठा हे वृत्तपत्र खळबळजनक गौप्यस्फोट करण्यासाठी प्रसिद्ध होते.

या वृत्तपत्राने मारोतरावांच्या पत्नी गोपिकाबाई यांच्याविरोधात मोहीम उघडली. या वृत्तपत्राला पश्चिम महाराष्ट्रातील नेत्यांनी खाद्य पुरवले. गोपिकाबाई कन्नमवारांचे सोने व हिऱ्यांची तस्करी यांच्यात संबंध असल्याची वावडी तेव्हा उठवण्यात आली. त्यामुळे एक दिवस 'मराठा'त हेडलाईन प्रसिद्ध झाली की, 'कन्नमवारांचे हिरे प्रकरण उद्या फोडणार!' यामुळे महाराष्ट्रात एकच खळबळ उडाली.

**कोण बरे हे मारोतराव कन्नमवार?**

मारोतराव कन्नमवार यांनी आपल्या मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळात अनेक ठोस निर्णय घेतले. पण ते कोण होते? याची कोणतीही खबरबात शासकीय अधिकाऱ्यांना नसल्याचा एक प्रसंग राज्याच्या राजकारणात घडला होता.

त्याचे झाले असे होते की, तत्कालीन राज्य सरकारने मारोतराव कन्नमवार यांच्या चंद्रपूर जिल्ह्यातील स्मारकासाठी मुबलक निधी देण्याचे आश्वासन दिले होते. पण प्रत्यक्षात त्याची तरतूदच केली नव्हती.

भाजप नेते सुधीर मुनगंटीवार यांनी यासंबंधी विधानसभेत मुख्यमंत्र्यांविरोधात हक्कभंगाची सूचना सादर केली होती. ही फाईल वित्त खात्यात मंजुरीसाठी गेली असता हे कन्नमवार कोण? असा प्रश्न तेथील अधिकाऱ्याने उपस्थित केल्याची बाब मुनगंटीवार यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिली होती. त्यांचे हे शब्द ऐकून अवघे सभागृह स्तब्ध झाले होते.

**सुसंस्कृत, सौम्य प्रशासक गमावला**

राजकारणातील कथित भ्रष्टाचाराच्या ज्वालामुखीचा पहिला उद्रेक होणार, या आशेने सर्वांनी श्वास रोखून धरला होता. या मानहाणीचा मारोतरावांवर एवढा परिणाम झाला की त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला आणि त्यातच त्यांचे निधन झाले.

यामुळे अवघा महाराष्ट्र सुन्न झाला. राज्याने एक सुसंस्कृत, संयमी व सौम्य विचारांचा उत्तम प्रशासक गमावला. नंतरच्या काळात त्यांचे कथित हिरे प्रकरण तसेच मागे पडले. पण वैयक्तिक हल्ले करून राजकारण्यांना संपवण्याची एक नवी पद्धत यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात रुजली. त्याची कटू फळे आजही महाराष्ट्राचे राजकारण चाखताना दिसून येते.

●●●●●●●●●●

## अशोकायन

### धन त्रयोदशी

उत्तम व्यवहारे
कमवावे धन
समाजात व्हावे
स्नेहवर्धन ..!

वचितांच्या
येता कामी
प्रसन्न होते
माता महालक्ष्मी ..!

परोपकारार्थ विनियोग
करता धनाचा
देई माता अनंत हस्ते
हा विश्वास
हवा आमचा ..!



**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**

## वाचक लिहितात

### आली दिवाळी दिवाळी आली!

दिवाळीचा सण मोठा नाही आनंदा तोटा।

दिवाळी आली की खरेदीची धुमधाम असते. सुगंधी तेल, उटणे ,वेगवेगळ्या रंगाचे आणि गंधाचे साबण, पणत्या तोरणे, आकाशदिवे, शोभेच्यावस्तू, कपडे, विविध प्रकारची मिठाई अशा विविध प्रकारच्या खरेदीसाठी ग्राहकांची गर्दी असते. ही खरेदी करत असतांना आपण खरेदी केलेल्या वस्तू हलाल शिक्का असलेल्या नाहीत ना? याची खात्री करायला हवी. हलाल उत्पादने म्हणजे देशाची आर्थिक स्थिती डबघाईला आणण्यासाठी असलेली समांतर अर्थव्यवस्था!

इतकेच नव्हे तर 'हलाल' उत्पादनांच्या विक्रीतून मिळणारा पैसा थेटआतंकवाद्यांना पुरवला जातो. लव जिहाद, लँडजिहाद, थुक जिहाद आपल्या परिचयाचे आहेत, परंतु हलाल जिहाद बद्दल तितकीशी जागृती झालेली नाही. हलाल विरुद्ध तीव्र चळवळ उभी करायला हवी संघटित प्रयत्न करायला हवेत काही नामांकित आस्थापनेही देशहिताचा विचार बाजूला सारून हलाल शिक्का असलेली उत्पादने विक्रीस ठेवतात.

आपले सैनिक रात्रंदिवस आपल्या सीमांचे रक्षण करत असतात. आतंकवाद्यांच्या हल्यामुळे प्रसंगी त्यांना आपले प्राणही गमवावे लागतात. त्यांच्यामुळे आज आपण सुरक्षित आहोत हे लक्षात घेऊन आपण योग्य कृती करायला हवी. हलाल उत्पादने बहिष्कृत करणे हा प्रत्येकालाच करता येण्यासारखा उपाय आहे ,त्याचबरोबर आपल्या शेजाऱ्यांना नातेवाईकांना हलाल जिहादची भीषणता, भयानकता सांगायला हवी.

'हलालला बहिष्कृत करा,' हा ज्ञानदीप आपण घरोघरी उजळवूया. ग्राहक हा राजा असतो. हे लक्षात घेऊन आपण सर्वांनी ही उत्पादने बहिष्कृत केली तरच त्यांची समांतर अर्थव्यवस्था मोडीत निघेल. हलालमुक्त दिवाळी साजरी करून आपली देशभक्ती जागवूया. देश जगला तर आपण जगू देश वाचला तरच आपण वाचू.

■ **श्रीमती संध्या काटदरे**
**माणगाव(रायगड)**

### दिवाळीत पाकिटमारांचा सुळसुळाट!

दिवाळी अगदी तोंडावर आल्याने सर्वत्रच्या बाजारपेठा रंगीबेरंगी कंदील, रांगोळ्या, पणत्या, विजेची तोरणे यांनी सजल्या आहेत. कपडे, भांडी, इलेक्ट्रॉनिक वस्तू यांच्या दुकानांतही गर्दी दिसू लागली आहे. शहरासारख्या ठिकाणी लहान रस्ते, त्यावरील नियमित जाणारी वाहने, रस्त्याच्या कडेला फेरीवाल्यांनी थाटलेली दुकाने आणि त्यामध्ये दिवाळीचा सीजन यांमुळे प्रचंड गर्दी होऊ लागली आहे.

या दिवसांत लोक परिवारासह खरेदीला बाहेर पडतात. त्यामुळे गर्दी आणखीनच वाढते. खरेदी करताना आपल्याला अनेक दुकानांत जावे लागते. अनेकदा खिशातील पाकीट काढून पैसे द्यावे लागतात. सध्याचे युग हे डिजिटल पेमेंटचे युग असल्याने अनेक जण युपीआय अँप्सच्या माध्यमातून पेमेंट करतात त्यामुळे खिशातील मोबाईल वारंवार बाहेर काढावा लागतो. आपल्यासाठी ही नियमित बाब असली तरी लोकांच्या गर्दीत सहभागी झालेले खिसेकापू आणि पाकीटमार आपल्यावर बारीक लक्ष ठेवून असतात.

संधी मिळताच गर्दीचा फायदा घेऊन खिशातील पाकीट, मोबाईल ते सहजपणे लंपास करतात. महिलांच्या दागिन्यांची सुद्धा या दिवसांत मोठ्या प्रमाणात चोरी होते. ऐन दिवाळीत संक्रांत कोसळल्याने ज्यांना असा अनुभव येतो ते बिचारे हताश होऊन जातात. दिवाळीचा फराळही त्यांना गोड लागत नाही.

या दिवसांत पाकीट, मोबाईल, दागिने चोरीच्या अनेक घटना पोलीस स्थानकांत नोंदल्या जातात. त्यामुळे दिवाळीच्या खरेदीसाठी जाताना अंगावर अधिक दागिने न घालणे, पाकिटात बेताची रोख रक्कम ठेवणे, पाकीट आणि मोबाईल खिशात ठेवताना ते काळजीपूर्वक ठेवणे हेच अधिक इष्ट ठरेल.

■ **जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई.**

# वी युजर्सना मिळणार क्षेत्रीय ओटीटी मनोरंजनाचा अजून जास्त लाभ

## वी मूव्हीज अँड टीव्ही ऍप सबस्क्रिप्शन प्लॅन्समध्ये सन एनएक्सटीचा समावेश

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. २८ :
देशातील आघाडीची टेलिकॉम कंपनी वी ने सन एनएक्सटी या सर्वात लोकप्रिय ओटीटी प्लॅटफॉर्मसोबत नव्या भागीदारीची घोषणा केली आहे. त्यामुळे आता दक्षिण भारतीय ब्लॉकबस्टर सिनेमे, विशेष सीरिज, टीव्ही शो, लाईव्ह टीव्ही आणि इतर बराच कन्टेन्ट तामिळ, तेलुगू, मल्याळम, कन्नड, बंगाली, मराठी आणि हिंदी या सात भाषांमध्ये पाहण्याचा आनंद वी युजर्सना मिळणार आहे. सन एनएक्सटीचा प्रीमियम कन्टेन्ट आता दरमहा अनुक्रमे २४८ आणि १५४ रुपये किमतीच्या वी मूव्हीज अँड टीव्ही प्लस आणि लाईट पॅकमध्ये कोणतेही अतिरिक्त शुल्क न घेता समाविष्ट करण्यात आला आहे. त्यामुळे आता डिस्ने+ हॉटस्टार, सोनीलिव, झी,




मनोरमामॅक्स इत्यादी इतर लोकप्रिय ओटीटी प्लॅटफॉर्म्ससोबत युजर्सना सन एनएक्सटीचा देखील आनंद घेता येईल. वी मूव्हीज अँड टीव्ही प्लस पॅकमुले ग्राहकांना ओटीटी सबस्क्रिप्शनवर लक्षणीय बचत करण्यात मदत मिळेल. त्याबरोबरीनेच वेगवेगळ्या सबस्क्रिप्शन्स सांभाळत बसण्याची आणि प्रत्येक ओटीटी प्लॅटफॉर्मसाठी पैसे भरण्याची गरज उरणार नाही. फिक्की-ईवायनेनुकत्याच केलेल्या एका सर्वेक्षणानुसार, २०२३ मध्ये हिंदी भाषेतील कन्टेन्ट व्हॉल्युम % तर क्षेत्रीय ओटीटी कन्टेन्ट व्हॉल्युम % होता. अधिक जास्त दर्शकांना आकर्षित करण्यासाठी राष्ट्रीय ओटीटी प्लॅटफॉर्म्ससाठी क्षेत्रीय भाषेतील कन्टेन्टचे महत्त्व यामध्ये अधोरेखित करण्यात आले आहे. आपल्या खूप मोठ्या दर्शकवर्गाला प्रीमियम क्षेत्रीय ओटीटी कन्टेन्ट मिळवून देण्यासाठी आणि या प्लॅटफॉर्म्सना खूप मोठ्या दर्शकांसोबत जोडण्यासाठी वी बांधील आहे. वी मूव्हीज आणि टीव्ही पोर्टफोलिओ हा युजर्सच्या वैविध्यपूर्ण आवडीनिवडी पूर्ण करण्यासाठी डिझाईन करण्यात आला आहे उदाहरणार्थ, बंगाली कन्टेन्टसाठी क्लिक, पंजाबी कन्टेन्टसाठी चौपाल, मल्याळमसाठी मनोरमामॅक्स आणि कन्नड कन्टेन्टसाठी नम्माफ्लिक्स. सन एनएक्सटीसोबत भागीदारी करण्यात आल्यामुळे वी युजर्सना सन एनएक्सटीवरील क्षेत्रीय सिनेमे, शो आणि इतर लोकप्रिय कार्यक्रम पाहता येतील. रजनीकांतचा अन्नाथें, विजयचा बीस्ट, धनुषचा थिरुचित्रंबलं, डॉक्टर, रवी तेजाचा ईगल इथे पाहता येईल. त्याशिवाय सहा वेगवेगळ्या भाषांमध्ये टीव्ही शो देखील पाहता येतील, यामध्ये कायल, सिंगपेने, राधा, नंदिनी का प्रतिशोध आणि संत गजानन यांचा त्यामध्ये समावेश आहे. सन एनएक्सटीसोबत भागीदारीमुळे वी मूव्हीज अँड टीव्हीमध्ये मिळणारा अनुभव अधिक समृद्ध होणार आहे, त्यावर आता क्षेत्रीय मनोरंजनाचे अजून जास्त पर्याय उपलब्ध होणार आहेत.

# आर्थिक वर्ष २०२५ च्या दुसऱ्या तिमाहीत आणि पहिल्या सहामाहीत शक्ती पंप्स (इंडिया) लि.ची दमदार कामगिरी

**नागपूर :** शक्ती पंप्स (इंडिया) लि. (एसपीआयएल) ने ३० सप्टेंबर २०२४ रोजी संपलेली तिमाही व सहामाहीचे आर्थिक निकाल जाहीर केले. कंपनीच्या कामगिरीबाबत आनंद व्यक्त करताना शक्ती पंप्स (इंडिया) लि.चे अध्यक्ष दिनेश पाटीदार म्हणाले की, महसूलात आणि नफ्यात वाढीसह कंपनीसाठी आणखी एक अद्वितीय तिमाही निकाल जाहीर करताना अत्यंत आनंद होत आहे. यामुळे आर्थिक वर्षातील पहिली सहामाही देखील उल्लेखनीय ठरली आहे. आमची कामगिरी ही देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय अशा दोन्ही क्षेत्रांमधील असलेल्या ऑर्डर्सच्या जलद अमंलबजावणीचा थेट परिणाम आहे. नफा क्षमतेमध्ये देखील लक्षणीय वाढ दिसली असून याचे श्रेय तिमाही दरम्यानच्या वाढलेल्या कामकाजामुळे अर्थव्यवस्थेतील व्यापकतेला जाते. सप्टेंबर २०२४



पर्यंत सुमारे १८०० कोटी रूपयांची आर्डर बुक असून याबाबत भक्कम स्थिती दर्शविते. पीएम कुसूम योजनेतील आमचे नेतृत्वाचे स्थान पाहता आम्हाला खात्री आहे की, असाच ऑर्डर्सचा ओघ येत राहील आणि आमच्या शाश्वत वाढीमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल. आमचे मजबूत ऑर्डरबुक पाहता आणि अधिक ऑर्डर

**दुसऱ्या तिमाहीत महसूल ६३५ कोटी रूपये तर पहिल्या सहामाहीत १२०२ कोटी रूपये कर पश्चात नफा दुसऱ्या तिमाहीमध्ये १०१ कोटी रूपये तर पहिल्या सहामाहीमध्ये १९४ कोटी रूपये**

सातत्याने मिळविण्याच्या आमच्या यशामुळे आम्हाला खात्री आहे की, आम्ही यावर्षी अपेक्षापेक्षा चांगली कामगिरी करू. हा आत्मविश्वास आमच्या वर्तमान ऑर्डर्स कार्यक्षमतेने कार्यान्वित करण्याची आमची क्षमता दर्शविते. याला आमच्या एकात्मिक उत्पादन क्षमतेचे पाठबळ आहे. याशिवाय आम्ही रिटेल तसेच ईव्ही व्यवसायात आमचा विस्तार करण्यावर लक्ष केंद्रित करत आहोत, जे भविष्यात शाश्वत, आर्थिक कामगिरीसाठी योगदान देतील.

# सोनीसबवरील बादलपेपांवहैमालिकेत चरण अरोराची भूमिका साकारणारी स्वाती तरार

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. २८ :
सोनी सबवरील बादल पे पांव है मालिकेत बानी (अमनदीप सिद्धू) या एका महत्त्वाकांक्षी तरुणीची कथा मांडली आहे, जी आपल्या कुटुंबाचे जीवनमान उंचावण्याचे स्वप्न बघत आहे. बानीचा आपल्या आईवर खूप जीव आहे. तिच्या आईची, चरण अरोराची भूमिका साकारली आहे, स्वाती तरार या अभिनेत्रीने. चरण अरोरा एक प्रेमळ आई आहे आणि बानीचा मोठा आधार आहे. एका दिलखुलास संभाषणात स्वातीने बादल पे पांव है या मालिकेविषयी, आपल्या व्यक्तिरेखेविषयी तसेच पंजाबात शूटिंग करण्याबाबत आपले मत मांडले.

**ही व्यक्तिरेखा साकारण्यातील सर्वात मोठे आव्हान कोणते होते?**

तशी बरीच आव्हाने होती, विशेषतः मला शूटिंगसाठी माझ्या शहरापासून लांब पंजाबला जावे लागले. पण आता हळूहळू मी येथे चांगलीच रुळले आहे. व्यक्तिरेखेच्या बाबतीत सांगायचे तर, मुख्य आव्हान हे होते की, माझ्यापेक्षा या व्यक्तिरेखेचा स्वभाव अगदीच वेगळा आहे. मी स्वतः खूप उत्साही आहे तर या भूमिकेसाठी मला शांत आणि स्थिर असण्याची गरज आहे. त्यामुळे या व्यक्तिरेखेची नस पडकडताना सुरुवातीला थोडा वेळ लागला पण आता मला ते जमले आहे.



**तुझ्या व्यक्तिरेखेविषयी आम्हाला सांग. तुझे स्वतःचे चरणशी किती साम्य आहे?**

मी साकारण असलेली चरण एक प्रेमळ आणि सुजाण आई आहे. ती शांत, प्रेमळ आणि प्रेरणादायक आहे जिचे आपल्या मुलांशी खूप घट्ट नाते आहे. तिच्या स्वभावातील विशेष गोष्ट ही आहे की, प्रत्येक परिस्थितीत तिला काही तरी सकारात्मक दिसते! व्यक्तिशः मला देखील असेच वाटते की, कठोर परिश्रम आणि सकारात्मक मानसिकता हीच यशाची गुरुकिल्ली आहे.

बादल पे पांव है मालिकेच्या विषयाबद्दल तुला काय वाटते? तुझ्या मते, बानीच्या पात्रातून विषय कसा प्रतिबिंबित होतो?

बादल पे पांव है एक अगदी नवीन आणि अनोखी गोष्ट आहे. ही मालिका कुटुंबिक नात्यांविषयीआहे आणि त्यात आपल्या कुटुंबाच्या उत्कर्षासाठी झटणाऱ्या स्त्रीची कहाणी असल्याने प्रेक्षकांना ती लगेच आपलीशी वाटली. तिच्या गोष्टीचे वेगळेपण यामध्ये आहे की, बानी आपली महत्त्वाकांक्षी स्वप्ने आणि कौटुंबिक मूल्ये यांच्यातील समतोल किती सफाईदारपणे सांभाळते. आकाशातल्या ताऱ्यांकडे झेप घेत असतानाही आपण कुठून आलो आहोत, हे ती कधीच विसरत नाही.

तुम्ही पंजाबात शूटिंग करत आहात, त्याबद्दल तुझा अनुभव सांग.

मी याआधी देखील आउटडोरशूटिंग केले आहे, पण पंजाबात शूटिंग करण्याचा अनुभव अगदी वेगळा आहे. जिकडे बघावे तिकडे हिरवळ आहे आणि मी घरापासून इतकी लांब आले आहे असे मला वाटतच नाहीये कारण माझे स्वतःचे गाव देखील अगदी असेच आहे. हवेत आता गारवा जाणवू लागला आहे. त्यामुळे शूटिंग करायला आणखी मजा येत आहे पंजाबातली शेते बघताना तर आम्ही सगळे पार वेडे होत आहोत. इथले लोक प्रेमळ आणि दिलखुलास आहेत. मालिकेतील कलाकार देखील खूप छान आहेत इतका काळ एकमेकांसोबत घालवल्यानंतर आम्ही जणू एक कुटुंबच झालो आहोत. एकंदरित, पंजाब आता आपलेसे वाटू लागले आहे.

अभिनयाचा अनुभव घेऊन मग निर्माते झालेले सरगुन मेहता आणि रवी दूबे या दोघांचे तुझ्या व्यक्तिरेखेला आकार देण्यात किती योगदान आहे?

# भाविकांसाठी अयोध्येत महाराष्ट्र भक्त सदन

**अमरावती :** भव्य-दिव्‍याम मंदिर उभारल्यानंतर देशभरातून भाविक व राम भक्तांनी अयोध्येत दर्शनासाठी गर्दी केली होती. तर, महाराष्ट्रातूनही भाविक मोठ्या प्रमाणात अयोध्येला रामललाच्या दर्शनासाठी गेले होते. महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही मंत्र्यांसह रामललाचे दर्शन घेतले होते त्यावेळी अयोध्येत महाराष्ट्र भक्त सदन बांधण्याची घोषणा त्यांनी केली होती. त्यानतंर अयोध्येत राम जन्मभूमी मंदिर परिसरात महाराष्ट्र भक्त सदन उभारण्यासाठी राज्य शासनाने जूनमध्ये जमीनही खरेदी केली होती. या जागेवर पर्यावरण पूरक हरित इमारत बांधण्यात येणार आहे. या इमारत बांधणीचे भूमिपूजन नुकतेच महाराष्ट्राचे सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण व उत्तर प्रदेशचे उपमुख्यमंत्री केशव प्रसाद मौर्य यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. महाराष्ट्रातील जनतेसाठी हा अतिशय आनंदाचा क्षण असल्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण यावेळी म्हणाले. याबाबत अधिक माहिती देताना मंत्री रविंद्र चव्हाण म्हणाले.

# आजचे राशिभविष्य

**मेष :** आजचा दिवस विशेष लाभ आणि प्रगतीचा असेल. संयमाने काम करा. तुम्हाला यश नक्कीच मिळेल. कोणाचीही दिशाभूल करू नका. नोकरीचा शोध पूर्ण होईल.

**वृषभ :** महत्त्वाच्या कामात यश मिळेल. किराणा व्यवसायाशी संबंधित लोकांना महत्त्वपूर्ण यश मिळेल. दूरच्या देशातून प्रिय व्यक्ती घरी पोहोचेल. राजकारणात एखाद्या खास व्यक्तीचे सहकार्य आणि साथ मिळेल.

**मिथुन :** तुमच्या महत्त्वाच्या कामात हुशारीने आणि विचारपूर्वक काम करा. कोर्ट केसमध्ये निर्णय तुमच्या बाजूने आल्याने तुम्हाला वडिलोपार्जित संपत्ती मिळेल. व्यवसायातील सहयोगी लाभदायक ठरतील.

**कर्क :** काही कामानिमित्त नको त्या प्रवासाला जावे लागेल. उद्योग क्षेत्रात नवीन सहकार्य करार होतील. कुटुंबात व्यर्थ खर्च अधिक होतील. कुटुंबातील सदस्य भौतिक सुखसोयींवर जास्त पैसे खर्च करू शकतात.

**सिंह :** आज व्यवसायात सर्व बाजूंनी आर्थिक लाभ होईल. त्यामुळे कोणतेही अपूर्ण काम पूर्ण केल्याने आर्थिक लाभ होईल. आणि तुमचे मनोबल वाढेल. व्यवसाय यशस्वी झाल्यास उत्पन्नाच्या संधी मिळतील.

**कन्या :** स्वत:वर अधिक विश्वास ठेवा. इतरांवर अवलंबून राहू नका. कार्यक्षेत्रात काही चढ-उतार येतील. आर्थिक बाबतीत नियोजनबद्ध पद्धतीने काम केल्यास फायदेशीर परिणाम मिळतील.

**तुळ:** आज घराबाबत काही समस्या निर्माण होऊ शकतात. कामाच्या ठिकाणी आराम आणि सोयींवर अधिक लक्ष असेल. व्यवसायात वडिलांचे सहकार्य मिळेल.

**वृश्चिक :** आज व्यवसायात काही शुभ घटना घडू शकतात. कोणतेही नवीन काम सुरू करणे टाळा. अन्यथा नुकसान होऊ शकते. नोकरदार वर्गाला रोजगाराच्या शोधात भटकावे लागेल.

**धनु :** आज कदाचित संघषार्चे प्रसंग येतील. तुमचे मनोबल आणि आत्मविश्वास कमी होऊ देऊ नका. परिस्थिती अनुकूल होईल. धर्मादाय कार्यात तुमची आवड वाढेल.

**मकर :** भाग्य तुम्हाला साथ देईल. कोणत्याही महत्त्वाच्या कामातील अडथळे सरकारच्या सहकार्याने दूर होतील. तुम्हाला काही सरकारी योजनेची जबाबदारी मिळू शकते. तुमचा मान-सन्मान वाढेल.

**कुंभ :** अति भावनेने कोणताही महत्त्वाचा निर्णय घेऊ नका. लोक तुमच्या असहायतेचा फायदा घेऊ शकतात. छोट्या प्रवासाचे योग येतील. व्यस्तता वाढेल. कामाच्या ठिकाणी सुधारणा करून तुम्ही यशस्वी व्हाल.

**मीन :** राजकारणात तुमचे नाव झळकेल. व्यवसायात नवीन भागीदार तयार होतील. विज्ञान क्षेत्रात काम करणा-यांनालक्षणीय यश मिळेल. आज तुमची आर्थिक बाजू मजबूत असेल. प्रलंबित पैसे मिळतील.

## सोनी सबवरील श्रीमद् रामायण मध्ये अश्वमेध यज्ञात सीतेची सुवर्ण प्रतिमा स्थापित करून श्रीरामाने सीतेचा सन्मान केला




■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २८ :
सोनी सबवरील श्रीमद् रामायण मालिकेने श्रीराम (सुजय रेऊ) आणि सीता (प्राची बंसल) यांची दिव्य कहाणी सादर करून प्रेक्षकांना आपलेसे केले आहे. आगामी भागात अश्वमेध यज्ञ केंद्रस्थानी असणार आहे. यज्ञाची तयारी करताना श्रीरामासमोर एक यक्षप्रश्न उभा राहतो. परंपरेनुसार, असा भव्य यज्ञ विवाहित जोडप्याने एकत्र मिळून करावा अशी प्रथा आहे. सीता अयोध्येत नसल्याने यज्ञविधी भरत (निखलेश राठोड) आणि त्याची पत्नी मांडवी (शीर्षा तिवारी) या दोघांनी करावा असे श्रीराम सुचवितात. पण, थोर मंडळी आग्रह धरतात की हे काम श्रीरामानेच केले पाहिजे.

एक राजाचे कर्तव्य आणि सीतेच्या अनुपस्थितीमुळे मनात निर्माण झालेली पोकळी या कात्रीत सापडलेले श्रीराम आपल्या पत्नीचा आणि त्यांच्या प्रेमाचा गौरव करण्यासाठी एक अनोखी युक्ती करतात. आपण यज्ञ विधी करणार असे ते जाहीर करतात आणि सीतेच्या स्थानी तिची सुवर्ण प्रतिमा स्थापित करून तिचे त्यांच्या जीवनातील चिरंतन अस्तित्व दाखवून देतात. या प्रतिमेमुळे पवित्र परंपरेचे पालन तर होतेच.

पण त्यामधून सीता जवळ नसतानाही तिच्यावरील प्रेमाने ओथंबलेले श्रीरामाच्या मनाचे दर्शन घडते.

अश्वमेध यज्ञ बघण्यासाठी आणि श्रीराम आणि सीतेला भेटण्यासाठी लव आणि कुश देखील अयोध्येत येऊन दाखल होतात. पण जेव्हा ते सीतेऐवजी तिची प्रतिमा बघतात, तेव्हा त्यांना खूप आश्चर्य वाटते. श्रीमद् रामायण मालिकेत श्रीरामाची भूमिका करणारा सुजय रेऊ म्हणतो, यज्ञकर्म करताना सीतेची प्रतिमा आपल्या शेजारी स्थापित करून श्रीराम केवळ परंपरेचे पालन करत नाहीत तर त्यांच्या अतूट प्रेमाची प्रचिती देतात. सीता प्रत्यक्षात हजर नसली तरी, रामाच्या हृदयातील सीतेचे अस्तित्व नाकारता येत नाही. या प्रसंगातून एक राजा म्हणून आपले कर्तव्य आणि पत्नीबद्दलची निष्ठा यांच्यातील संतुलन श्रीरामांनी साधले आहे. हा एक लक्षणीय क्षण आहे. भावना आणि प्रतिकात्मकतेने उत्कट झालेला क्षण आहे.

**Format C-7**

(for political parties to publish in the newspapers, social media platforms & website of the party)

Information regarding individuals with pending criminal cases, who have been selected as candidates, along with the reasons for such selection, as also as to why other individuals without criminal antecedents could not be selected as candidates.

(As per the Commission's directions issued in pursuance of the Order dated 13.02.2020 of the Hon'ble Supreme Court in contempt petition(C) no. 2192 of 2018 in WP(C) no. 536 of 2011)

**Name of Political Party : Bharatiya Janata Party**
***Name of the Election : Maharashtra Legislative Assembly-2024**
**Name of State/UT : Maharashtra**
**(1) Name of the Constituency : 49 - Saoner**
**Name of the candidate : DR. ASHISH RANJEET DESHMUKH**

| Sl. No. | | | |
|---|---|---|---|
| | **Criminal antecedents** | | |
| 1. | a. | Nature of the offences | 1) FIR No. 49/2018, u/s. 341, 143 of IPC, Sec. 135 Maharashtra Police Act with Kondhali Police Station, Nagpur.<br>2) FIR No. 124/2018, u/s. 341, 143, 188 of IPC with Katol Police Station, Nagpur.<br>3) FIR No. 186/2019, u/s. 120B, 467, 468, 471, 420 of IPC, Sec. 7, 8, 11, 13 of PCA, 1988 with Bisrakh Police Station, UP<br>4) FIR No. 131/2018, u/s. 143, 188 of IPC with Katol Police Station, Nagpur.<br>5) FIR No. 14/2017, u/s. 336, 504, 506, 427 of IPC with Katol Police Station, Nagpur. |
| | b. | Case no. | 1) S.C.C. No. - 104/2019<br>2) S.C.C. No. - 756/2018<br>3) FIR No. 186/2019<br>4) S.C.C. No. - 887/2018<br>5) S.C.C. No. - 525/2017 |
| | c. | Name of the Court | 1) Civil Judge Junior Division JMFC, Katol.<br>2) Civil Judge Junior Division JMFC, Katol.<br>3) No Submitted in Court.<br>4) Civil Judge Junior Division JMFC, Katol.<br>5) Civil Judge Junior Division JMFC, Katol. |
| | d. | Whether charges have been framed or not (Yes/No) | No |
| | e. | Date of conviction, if any | NIL |
| | f. | Details of punishment undergone, if any | NIL |
| | g. | Any other information required to be given | The Cases are still under consideration before Hon'ble Court |
| 2. | The reasons for the selection of the candidate. Selection shall be with reference to the qualifications, achievements and merit of the candidate, and not mere "winnability" at the polls (not more than 100 words) | | Candidate **Dr. Ashish Ranjeet Deshmukh** has been Senior Legislator. He has very strong administrative capacity. Looking at his experience he has been chosen. |
| 3. | Reasons as to why other individuals without criminal antecedents could not be selected as candidates (not more than 100 words) | | All other names who were, aspirants did not have any relevant experience in public life to holds such senior post. |

**(2) Name of the Constituency : 49 - Saoner**
**Name of the candidate : DR. ASHISH RANJEET DESHMUKH** .................... and so on

* In the case of election to Council of States or States or Election to Legislative Council bye MLAs, mention the election concerned in place of name of Constituency.

Signature of office bearer of the Political Party
Name and designation...

**Date : 28/10/2024**
**Place : Mumbai**

**Chandrashekhar Bawankule**
**President,**
**Bharatiya Janata Party, Maharashtra**

# बाळापूरमध्ये शिवसेनेच्या धनुष्यबाणावर भाजपचे बळीराम सिरस्कार; रिसोडमध्ये भावना गवळींना संधी

■ महासागर प्रतिनिधी
**अकोला, दि. २८ :**

विधानसभा निवडणुकीसाठी बाळापूर मतदारसंघातून शिवसेना शिंदे गटाने भाजपचे बळीराम सिरस्कार यांना उमेदवारी जाहीर केली. विधान परिषदेच्या आमदार भावना गवळी यांना शिवसेना शिंदे गटाने रिसोड मतदारसंघातून निवडणुकीच्या रिंगणात उतरवले आहे. या दोन्ही मतदारसंघावर महायुतीतील प्रमुख तिन्ही घटक पक्षांनी दावा केला होता. अखेर महायुतीतील जागा वाटपाचा तिढा सुटला. महायुतीमध्ये राजकीय तडजोड करण्यात आली असून बाळापूर मतदारसंघ शिवसेनेसाठी सुटला तरी उमेदवार हा भाजपमधून देण्यात आला आहे.



विधानसभा निवडणुकीसाठी शिवसेना शिंदे गटाची दुसरी यादी रविवारी रात्री जाहीर केली. यामध्ये शिवसेना शिंदे गटाने बाळापूर मतदारसंघातून बळीराम सिरस्कार, तर रिसोड मतदारसंघातून भावना गवळी यांना उमेदवारी दिली. बाळापूर आणि रिसोड मतदारसंघासाठी महायुतीतील घटक पक्षांमध्ये गेल्या काही दिवसांपासून ओढाताण सुरू होती. युतीमध्ये परंपरागत या जागांवर शिवसेना लढत असल्याने शिंदे गटाने या दोन्ही मतदारसंघासाठी आग्रह धरला. भाजपने अखेर महायुतीत बाळापूर आणि रिसोड मतदारसंघ शिवसेना शिंदे गटासाठी सोडले. बाळापूर मतदारसंघामध्ये शिवसेना शिंदे गटात अनेक इच्छुक असताना उमेदवारी मात्र भाजपतील बळीराम सिरस्कार यांना दिली.

बळीराम सिरस्कार यांनी बाळापूर मतदारसंघाचे दोन वेळा प्रतिनिधित्व केले आहे. २००९ मध्ये ते भारिप-बमसं समर्थित अपक्ष आमदार म्हणून निवडून आले होते. त्यानंतर २०१४ मध्ये सलग दुसऱ्यांदा भारिप बहुजन महासंघाच्या तिकिटावर विधानसभा गाठली. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत वंचित आघाडीने त्यांना बुलढाणा लोकसभा मतदारसंघातून निवडणूक रिंगणात उतरवले होते.

त्या ठिकाणी पराभव झाल्यानंतर बाळापूर मतदारसंघातून त्यांना उमेदवारी नाकारण्यात आली. बळीराम सिरस्कार यांनी वंचितला सोडचिठ्ठी देत राष्ट्रवादीमध्ये दाखल झाले.

दोन वर्षांपूर्वी त्यांनी राष्ट्रवादी सोडून भाजपमध्ये प्रवेश घेतला. ते बाळापूरमधून लढण्यासाठी इच्छुक असतानाच या मतदारसंघावर शिंदे गटाने दावा केला. आज शिवसेना शिंदे गटाकडून सिरस्कार यांना उमेदवारी मिळाली. आता बाळापूरमध्ये दोन्ही शिवसेना व वंचित आघाडी अशी तिरंगी लढत होण्याची शक्यता आहे.

वाशीम जिल्ह्यातील रिसोड मतदारसंघात शिवसेनेने विधान परिषदेच्या आमदार भावना गवळी यांना उमेदवारी दिली. लोकसभा निवडणुकीत यवतमाळ-वाशीम मतदारसंघातून भावना गवळी यांना उमेदवारी नाकारण्यात आली होती. काही महिन्यांपूर्वीच त्यांचे राजकीय पुनर्वसन करून विधान परिषदेवर घेण्यात आले. तरीही त्या रिसोडमधून विधानसभा निवडणूक लढण्यास इच्छुक राहिल्या. शिंदे गटाने त्यांनाच रिसोड मतदारसंघातून विधानसभा निवडणुकीच्या मैदानात उतरवले आहे.



# विद्यानिकेतन शाळा क्रीडा स्पर्धेत राज्यस्तरावर अव्वल

■ महासागर प्रतिनिधी
**दिग्रस, दि. २८ :**

शैक्षणिक क्षेत्राचा वारसा घेऊन जाणाऱ्या विद्यानिकेतन व विद्याभारती या इंग्रजी माध्यमाच्या शाळांचे विद्यार्थी शिक्षण क्षेत्रामध्ये नाविन्यपूर्ण गुण प्राप्त करण्याचा बहुमान मिळवतात.

त्याचप्रमाणे २०२३ -२४ या वर्षांमध्येही क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यवतमाळ यांच्या संयुक्त विद्यमानाने मैदानी खेळांच्या स्पर्धेत विविध खेळांच्या स्पधेर्चे आयोजन करण्यात आले होते. यात विद्यानिकेतन शाळेच्या संघाने विविध प्रकारांत उल्लेखनीय कामगिरी केली.

यामध्ये मैदानी खेळांच्या १७ वषार्खालील विविध क्रीडा स्पर्धेमध्ये विद्यानिकेतन या खासगी शाळेच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय स्तरावर, तसेच राज्य स्तरावर व विभाग स्तरावर प्रत्येक खेळामध्ये प्राविण्य पटकाविल्यामुळे त्यांना प्रथम क्रमांकाचा पुरस्कार देण्यात आला. विद्यानिकेतन शाळेचे क्रीडा शिक्षक उमेश भटकर यांना प्रथम क्रमांकाचे ८३ हजार ५३९ रुपयांचे बक्षीस जिल्हा क्रीडा अधिकारी घनश्याम राठोड यांच्या हस्ते धनादेश देऊन सन्मानित करण्यात आले. कुंभार मातीचे मडके घडवतो, त्याचप्रमाणे शाळेतील विद्यार्थ्यांमधील कलागुणांचा शोध घेऊन त्यास घडवण्याचं कसब क्रीडा शिक्षकांत असते.

या यशाचे सर्व श्रेय विद्यार्थ्यांनी क्रीडा शिक्षक उमेश भटकर यांना दिले आहे.

विद्यार्थ्यांमध्ये विविध कला गुण दडलेले असतात. मात्र कोणता विद्यार्थी कोणत्या खेळामध्ये पारंगत होईल, याची खऱ्या अर्थाने पारख करून त्या विद्यार्थ्याला त्या खेळामध्ये तयार करून घेणे, हे क्रीडा शिक्षकाचे कर्तव्य असते. ही शाळेप्रती असलेली त्यांची एक जबाबदारी देखील आहे, असे मत या वेळी व्यक्त करण्यात आले.

# दिवाळीनिमित्त बाजारात चैतन्य, इलेक्ट्रिक, कँडल, मातीच्या पणत्यांना पसंती



■ महासागर प्रतिनिधी
**यवतमाळ दि. २८ :**

तिमिरातूनी तेजाकडे नेत सर्वांच्या आयुष्यात प्रकाशाचे पर्व घेऊन येणारा सण म्हणजे दिवाळी. हा सण म्हणजे प्रकाशाचा उत्सव. त्यामुळे या सणात पणती, दिव्याचे महत्त्व मोठे आहे. आसमंत उजळून टाकणाऱ्या दिव्यांच्या विविध प्रकारांनी बाजारपेठा सजल्या आहेत. ग्राहकांच्या पसंतीसाठी पारंपरिक दिव्यांबरोबरच आधुनिक ट्रेंडिंग पणत्या बाजारपेठेत दाखल झाल्या आहेत. स्वस्तिक, पाने, फुले, चांदण्या अशा वैविध्यपूर्ण आकारातील पणत्या बाजारात आहेत. याच बरोबर विविध नक्षीकाम केलेल्या नक्षीदार पणत्या महिलांसाठी बाजारात उपलब्ध आहेत.

दिवाळीमध्ये सर्वाधिक महत्त्व दिले जाते ते पणत्यांना. वसुबारसपासूनच दीपोत्सवाला सुरुवात होते. आणि बघता बघता या पणत्यांमुळे घराचे अंगण प्रकाशाने उजळून जाते. मंगलमय वातावरणात रंग भरणाऱ्या दिव्यांमध्ये दरवर्षी नवनवीन प्रकार बघायला मिळत आहेत. आधीच्या काळी एकाच साच्यातून तयार होणाऱ्या पारंपरिक पणत्या बाजारपेठेत पाहायला मिळत असायच्या. मात्र आता हळूहळू जसा काळ बदलतो आहे, तश्या पणत्याही बदलत आहेत.

यंदा स्वस्तिक, फुले, पाने, चांदण्या, नक्षीकाम केलेल्या रंगीत व साध्या मातीच्या पणत्या उपलब्ध आहेत. पाच रुपये ते दीडशे रुपयांना एक अशी या पणत्यांची किंमत आहे. क्रिएटिव्ह पणत्यांमध्ये आरसे, कुंदन, मोती, चमकी आणि खड्यांचा वापर केला असून, खास लक्ष्मीपूजनासाठी या पणत्यांची खरेदी करीत आहेत. यातही हंडी, लामण दिवा, नारळ, ताम्हन असे विविध आकार उपलब्ध आहेत. या पणत्या २५ रुपयांपासून दोन हजार रुपयांपर्यंत विविध किंमतीत उपलब्ध आहेत. साध्या पणत्यांनाही मागणी आहे.

सेलवर चालणाऱ्या कँडल पणत्या बाजारपेठेत दाखल झाल्या आहेत. चंद्रकोर, आकाश कंदील अशा आकारातील या इलेक्ट्रिक पणत्यांनी ग्राहकांना भुरळ घातली आहे. या पणत्या २४ तास तेवत राहतात, अशी माहिती पणती विक्रेते कुणाल शिंदे यांनी दिली. ८० रुपयांपासून या पणत्या उपलब्ध आहेत.

## पारवेकर कॉलेजमध्ये कार्यशाळा उत्साहात

**यवतमाळ** : आबासाहेब पारवेकर महाविद्यालयच्या गृह अर्थशास्त्र विभाग व राष्ट्रीय सेवा योजना पथकाद्वारे, तरुणांमधील व्यसनाधीनता व एड्स जनजागृती या विषयावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उदय नावलेकर यांच्या मार्गदर्शनात कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे इंग्रजी विभाग प्रमुख व प्रभारी प्राचार्य डॉ. संजय तामगाडगे तर डॉ. विनोद जाधव प्रमुख मार्गदर्शक म्हणून लाभले होते. प्रमुख मार्गदर्शकांचा परिचय डॉ. नीता राऊत यांनी करून दिला. प्रा. अस्मिता शहाळे यांनी व्यसनमुक्ती यावर गीत गायन करून या कार्यशाळेला सुरुवात झाली. प्रमुख वक्ते डॉ. विनोद जाधव यांनी विद्यार्थ्यांना संबोधताना म्हणाले की, व्यसन कोणकोणते आहे आणि त्यांच्या आहारी व्यक्ती कसा जातो, त्याचे परिणाम शारीरिक अवयवांवर कशा पद्धतीने होतात, त्यावरील उपाय म्हणजे एकंदरीतच कोणत्याही सवयीचे व्यसन लावून घेऊ नये. अध्यक्षीय मार्गदर्शनात डॉ. संजय तामगाडगे म्हणाले की, व्यसन हे प्रत्येकालाच असते. महाविद्यालयाचे प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी वृंद व विद्यार्थी या वेळी उपस्थित होते.

# लोणार-पुणे बस फेरी बंद

■ महासागर प्रतिनिधी
**बुलडाणा दि. २८ :**

लोणार बसस्थानकामधून धावत असलेल्या लांबपल्ल्याच्या बसेस बंद करण्याचा सपाटा राज्य परिवहन महामंडळाने लावला आहे. काही दिवसांपूर्वी लोणार पुणे ही एकमेव थेट बस सेवाही बंद करण्यात आल्याने ऐन दिवाळीत प्रवाशांची गैरसोय होणार असून त्यांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागणार आहे.

जागतिक पर्यटन स्थळ असलेल्या लोणार येथे राज्य परिवहन महामंडळाचे आगार नसल्याने लोणार येथील व तालुक्यातील प्रवाशांची प्रवासाची सेवा राज्यातील इतर आगाराच्या बसफेऱ्यांवर अवलंबून आहे. लोणार बसस्थानक मेहकर आगार अंतर्गत येते. पर्यटनस्थळ असलेल्या लोणार बस स्थानकातून पाहिजे त्या प्रमाणात बस फेऱ्या सुरू नाहीत. या समस्येकडे राज्य परिवहन महामंडळाच्या वरिष्ठांचे दुर्लक्ष होत आहे. लोणार येथून नियमित सुरू असलेली एकमेव पुणे बस फेरी मेहकर आगाराकडून बंद करण्यात आली आहे. त्यामुळे प्रवाशांना बसेस बदलून आपला प्रवास करावा लागत आहे. त्यामुळे दिवाळी सणानिमित्त लोणार पुणे ही बस फेरी सुलतानपूर मार्गे सुरू करण्याची मागणी प्रवासी, पर्यटक, विद्यार्थी करीत आहेत. बसमध्ये महिला, ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थ्यांना तिकीट दरात सवलत असल्याने असंख्य प्रवाशी लालपरीकडे वळले आहेत. त्या तुलनेत आवश्यक बस फे?्या सोडल्या जात नसल्याने लोणार तालुक्यातील प्रवाशांना इतर ठिकाणावरून लांब पल्ल्याची बस पकडावी लागत आहे.

टप्प्याटप्प्याने केल्या अनेक बस बंद जागतीक पर्यटन स्थळ असलेल्या लोणार येथून मेहकर आगाराकडून चालक, वाहक व वाहनाच्या कमतरतेचे कारणे पुढे करून पुणे, बीड, जळगाव आणि अकोला या नियमित सुरू असलेल्या एकमेव बस फेऱ्या टप्प्याटप्प्याने बंद केल्या आहे. त्यामुळे प्रवाशांची गैरसोय होत आहे.

# मालखेड भुयारी रस्त्यावर खड्डे पडल्यामुळे वाहनचालक त्रस्त

■ महासागर प्रतिनिधी,
**चांदुर रेल्वे दि. २८ :**

अमरावती ते मालखेड मार्गावरील रेल्वे पुलाच्या खालील अलीकडे बांधलेल्या रस्त्यावे विदारक वास्तव काही दिवसातच पुढे आले आहे. या रस्त्याला ठिकठिकाणी त्यावर खड्डे पडले असून त्यात पावसाचे पाणी साचून चिखल तयार झाला आहे. इतकेच नव्हे, तर रस्त्याच्या कॉंक्रिटमधील सळाखी बाहेर येऊन त्या अपघाताला आयतेच आमंत्रण देत असल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला असून, याची रेल्वे प्रशासनाने दखल घेण्याची मागणीही करण्यात येत आहे. मालखेड मार्गावरील रेल्वे पुलाखालील रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहे. बाहेर आलेल्या या लोखंडी सळाखी एखाद्या वाहनाच्या चाकात अडकून अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

नागरिकांसह या मार्गावरून जाणाऱ्या वाहन चालकांच्या जीविताचे हित लक्षात घेता रेल्वे प्रशासनाने या रस्त्यावर पडलेले खड्डे त्वरित बुजवावे, अशी मागणी वाहन चालक व नागरिकांकडून होत आहे. पावसाळ्यात कोसळली होती अंडरब्रिजची भिंत मालखेड येथील अमरावतीवरून येणाऱ्या या मुख्य रस्त्याची दुरवस्था झाली आहे.

**Format C-7**

(for political parties to publish in the newspapers, social media platforms & website of the party)

Information regarding individuals with pending criminal cases, who have been selected as candidates, along with the reasons for such selection, as also as to why other individuals without criminal antecedents could not be selected as candidates.

(As per the Commission's directions issued in pursuance of the Order dated 13.02.2020 of the Hon'ble Supreme Court in contempt petition(C) no. 2192 of 2018 in WP(C) no. 536 of 2011)

**Name of Political Party : Bharatiya Janata Party**

***Name of the Election : Maharashtra Legislative Assembly-2024**

**Name of State/UT : Maharashtra**

**(1) Name of the Constituency : 55 - Nagpur Central**

**Name of the candidate : PRAVIN PRABHAKARRAO DATKE**

| Sl. No. | | | |
|---|---|---|---|
| | **Criminal antecedents** | | |
| 1 | a. | Nature of the offences | 1) FIR No.577/2021, u/s. 143, 188, 269, 270 of IPC, Sec. 51 (b) of Disaster Management Act, u/s 3 Prevention of the Epidemic Diseases Act 1897 Act, u/s. 135 Maharashtra Police Act with Ambazari Police Station.<br>2) FIR No.135/2018, u/s. 143, 145, 147, 149, 269, 341, 34 of IPC with Ganeshpeth Police Station.<br>3) FIR No.3283/2017, u/s. 135 Maharashtra Police Act with Lakadganj Police Station.<br>4) FIR No.42/2022, u/s. 188, 270 of IPC. Sec. 135 Maharashtra Police Act with Lakadganj Police Station.<br>5) FIR No.111/2022, u/s. 188,143 of IPC, Sec. 135 Maharashtra Police Act with Lakadganj Police Station. |
| | b. | Case no. | 1) SCC No.21205/2021<br>2) CCNo.3878/2022<br>3) CC No.21268/2019<br>4) CC No.5687/2022<br>5) CC No.4899/2023 |
| | c. | Name of the Court | 1) 8th Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Nagpur.<br>2) 8th Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Nagpur.<br>3) 12th Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Nagpur.<br>4) 12th Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Nagpur.<br>5) 12th Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Nagpur |
| | d. | Whether charges have been framed or not (Yes/No) | No |
| | e. | Date of conviction, if any | NIL |
| | f. | Details of punishment undergone, if any | NIL |
| | g. | Any other information required to be given | The Cases are still under consideration before Hon'ble Court. |
| 2 | The reasons for the selection of the candidate. Selection shall be with reference to the qualifications, achievements and merit of the candidate, and not mere "winnability" at the polls (not more than 100 words) | | Candidate **Pravin Prabhakarrao Datke** has been Senior Legislator. He has very strong administrative capacity. Looking at his experience he has been chosen. |
| 3 | Reasons as to why other individuals without criminal antecedents could not be selected as candidates (not more than 100 words) | | All other names who were, aspirants did not have any relevant experience in public life to holds such senior post. |

**(2) Name of the Constituency : 55 - Nagpur Central**

**Name of the candidate : PRAVIN PRABHAKARRAO DATKE** ............................ and so on

* In the case of election to Council of States or States or Election to Legislative Council by MLAs, mention the election concerned in place of name of Constituency.

Signature of office bearer of the Political Party
Name and designation...
**Chandrashekhar Bawankule**
**President,**
**Bharatiya Janata Party, Maharashtra**

**Date : 28/10/2024**
**Place : Mumbai**

RNINo-20789/71 महासागर नागपूर
मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक
मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३

# कॅलिडोस्कोप

## महागड्या घरांमध्ये अंबानींच्या इमारतीचा समावेश



लोक आपल्या स्वप्नातील घर खरेदी करू इच्छितात किंवा बनवू इच्छितात. त्यात त्यांच्या मनाप्रमाणे डिझाईन केले असेल तर विचारायलाच नको. जगभरातील महागडी घरे ही केवळ त्यांच्या देखाव्यामुळेच नव्हे, तर आलिशान सोयीसुविधा, अंतर्गत जागा आणि घराच्या स्थानामुळेदेखील खूप प्रभावी ठरतात.

लंडनच्या वेस्टमिन्स्टर शहरात असलेले बकिंगहॅम पॅलेस हे जगातील सर्वात महागडे घर आहे. २०२३ मधील सर्वात महागड्या घराचा किताब या राजवाड्याच्या नावावर आहे. हा राजवाडा ब्रिटिश राजघराण्याच्या मालकीचा असून १८३७ पासून ते ब्रिटनच्या सम्राटाचे लंडनमधील अधिकृत निवासस्थान आहे आणि आता हे राजाचे अधिकृत मुख्यालयदेखील आहे. बकिंगहॅम पॅलेस हे अधिकृतपणे जगातील सर्वात श्रीमंत घर आहे. या राजवाड्यात ७७५ बेडरूम, ७८ बाथरूम, ५२ रॉयल आणि गेस्ट रूम, ९२ कार्यालये आणि १९ राजकीय कक्ष आहेत. क्षेत्राच्या दृष्टीने हा राजवाडा अंदाजे आठ लाख २८ हजार चौरस फूट आहे. राजवाड्याची बागच ४० एकरांची आहे. हा राजवाडा कधी विक्रीसाठी गेला तर त्याची किंमत अंदाजे १.३ अब्ज डॉलर्स असेल.

मुंबईतील अँटिलीया हे जगातील दुसऱ्या क्रमांकाचे सर्वात महागडे घर आहे. हे घर भारतातील सर्वात श्रीमंत व्यक्ती मुकेश अंबानी यांच्यासाठी तयार केले गेले. अंबानी हे फॉर्च्यून ग्लोबल ५०० कंपनी यादीतील रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेडचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक आहेत. हे घर शिकागो आधारित 'पर्किन्स अँड विल' नावाच्या आर्किटेक्चर फर्म आणि हॉस्पिटॅलिटी डिझाईन फर्म 'हर्श बेंडर असोसिएट्स' यांनी बनवले आणि डिझाईन केले आहे. चार लाख चौरस फूट क्षेत्र असलेले हे घर मुंबईच्या कुंबल्ला हिल शेजारी असून ही इमारत २७ मजले उंच आहे. अँटिलीया ही इमारत भूकंप प्रतिरोधक आहे. ती आठ रिश्टर स्केल तीव्रतेच्या भूकंपातही तग धरू शकते. अँटिलियाचे सहा मजले हे मालक आणि अतिथी यांच्या कार पार्किंगसाठी समर्पित आहेत. या घरात हेल्थ स्पा, एक आईस्क्रीम रूम, एक मंदिर, ५० आसनी चित्रपटगृह, एक सलून, तीन हेलिपॅड आणि एक बॉलरूम आहे.

## गूढरम्य आॅईनहॅलो बेट



जगभरात बरीच बेटं आहेत. काही बेटं खूपच रहस्यमयी असल्याचं म्हटलं जातं. त्यापैकी एक बेट स्कॉटलंडमध्येही आहे. 'आईनहॅलो' असं या बेटाचं नाव आहे. बदामाच्या आकाराचं हे बेट खूप सुंदर आहे. पण लोकांना वर्षातला फक्त एकच दिवस इथे येण्याची परवानगी मिळते. उर्वरित ३६४ दिवस कोणालाही या बेटावर येता येत नाही. या बेटाचा आकार खूपच लहान आहे. त्यामुळे हे बेट नकाशावरही पटकन सापडत नाही. या बेटाशी संबंधित काही आख्यायिकाही आहेत. इथे भूताप्रेतांचा वास असल्याचं काही पौराणिक कथांमध्ये नमूद करण्यात आलं आहे. काही आख्यायिकांनुसार इथल्या बेटांवर नकारात्मक शक्तींचा प्रभाव आहे. या नकारात्मक शक्ती हे बेट गायब करतात, असेही उल्लेख काही ठिकाणी आढळतात. या बेटावर जलपऱ्यांचं अस्तित्व असून या पऱ्या उन्हाळ्यात समुद्रातून बाहेर पडत असल्याचंही बोललं जातं. अर्थात बुद्धीजीवींचं याबाबत वेगळं मत आहे. एके काळी या बेटावर माणसं रहात होती. मात्र १८५१ मध्ये इथे प्लेगची साथ आली. यामुळे इथले लोक बेट सोडून निघून गेले. आता हे बेट वैराण झालं आहे. इथे पुरातन इमारतींचे अवशेषही मिळाले आहेत. आईनहॅलो हे बेट ओर्कने बेटापासून अवघ्या ५०० किलोमीटर अंतरावर आहे.

## कामगाराच्या खात्यात आले ७५३ कोटी!



एका साध्या मेडिकल दुकानात १५ हजार रुपये मासिक पगारावर काम करणाऱ्या एका व्यक्तीने आपल्या मित्राला दोन हजार रुपये ट्रान्सफर केले. त्यानंतर त्याच्या खात्यात अचानक ७५३ कोटी रुपये जमा झाले! खात्यात जमा झालेला कोट्यवधींचा पैसा पाहून तोही चक्रावून गेला.

चेन्नईच्या करणकोविल येथे राहणारा महम्मद इद्रिस हा तरुण तेनामापेठ येथील एका मेडिकल दुकानात काम करतो. त्याने सात ऑक्टोबर रोजी त्याच्या कोटक महिंद्रा बँकेच्या खात्यातून आपल्या मित्राला दोन हजार रुपये पाठवले होते. त्यानंतर आलेला बँक बॅलन्सचा एसएमएस पाहून इद्रिस चक्रावून गेला. त्याच्या पायाखालची जमीनच सरकली. कारण, मेसेजमधून कळले की त्याचा बँक बॅलन्स ७५३ कोटींवर पोहोचला आहे. त्याच्या फोनवर आलेला एसएमएस पाहून त्याला आश्चर्य वाटले. तो चक्क करोडपती झाला होता.

या सगळ्या प्रकारानंतर इद्रिसने याची माहिती लगेच बँकेला दिली आणि बँकेकडून त्याचे अकाउंट सीज करण्यात आले. म्हणजेच बँकेकडून त्याचे खाते गोठवण्यात आले. बँकेने यावर स्पष्टीकरण देताना सांगितले की तांत्रिक त्रुटींमुळे त्याच्या खात्यात इतकी मोठी रक्कम जमा झाली होती. इद्रिसने म्हटले की याबाबत बँक शाखा अधिकाऱ्यांनी योग्य स्पष्टीकरण दिले नाही. दरम्यान, दुसरीकडे कोटक महिंद्रा बँकेच्या प्रवक्त्याने सांगितले की एसएमएस मेसेजिंगमधील त्रुटीमुळे ही घटना घडली. इद्रिस यांच्या खात्यात पैसे जमा झाल्याचा एसएमएस दिसत आहे. पण त्याच्या खात्यात प्रत्यक्षात कुठलीही रक्कम जमा झालीच नाही. तसेच टीम यावर काम करत असल्याचे त्यांनी सांगितले. चेन्नई शहरातील ही काही पहिली घटना नाही. याआधीही असे प्रकार घडले आहेत. तामिळनाडू शहरातील ही दुसरी घटना आहे. यापूर्वी चेन्नईतील एक कॅब चालक राजकुमार यांनाही असाच धक्का बसला होता. कॅब ड्रायव्हरला त्याच्या तामिळनाडू मर्कंटाईल बँकेमधील खात्यात नऊ हजार कोटी जमा झाल्याचा मेसेज अकाऊंट बॅलन्स चेक करताना आला होता. त्यानंतर टीएमबी बँकेने तत्काळ कारवाई करत त्यांच्याकडून पैसे परत घेतले होते.

## बिंबीसार राजाच्या पाचशे बायका!



भारताचा इतिहास अशा राजे आणि सम्राटांच्या कथांनी भरलेला आहे, ज्यांनी आपल्या आयुष्यात एकाहून अधिक लग्नं केली आहेत. पण यात असेही काही राजे आहेत, ज्यांनी आपल्या आयुष्यात १०० पेक्षा जास्त लग्नं केली आहेत. एका राजाने १००-२०० नव्हे तर तब्बल ५०० मुलींशी लग्न केले; मात्र त्यांच्या खास पत्नींच्या यादीत केवळ तीनच नावांचा समावेश आहे.

या राजाचे नाव आहे 'बिंबीसार'. मौर्य साम्राज्याचे संस्थापक चंद्रगुप्त मौर्य यांचे ते पुत्र होते तर मौर्य सम्राट अशोका यांचे ते वडील होते. बिंबिसारच्या कारकिर्दीबद्दल बोलायचे झाले तर ते ५५८ इ. स. पूर्व ते ४९१ इ. स. पूर्व कालखंडात होते. इतिहासात बिंबिसाराला श्रेनिक या नावानेही ओळखले जाते. असे म्हटले जाते की पूर्वी ते बौद्ध धर्माचे अनुयायी होते; परंतु शेवटच्या क्षणी पत्नी चेल्लामा यांच्या शिकवणीने प्रभावित होऊन त्यांनी जैन धर्म स्वीकारला. बिंबिसारला तीन मुख्य बायका होत्या. त्यांची पहिली पत्नी चेल्लमा होती. दुसरी मुख्य पत्नी खेमा तर तिसरी मुख्य पत्नी कौसल्या देवी होती. महावग्गा या बौद्ध ग्रंथानुसार, बिंबिसारने त्याच्या हयातीमध्ये सुमारे ५०० राजकन्यांशी विवाह केला. आपल्या साम्राज्याचा विस्तार करण्यासाठी त्याने हे पाऊल उचलले. बिंबिसारचा सुरुवातीपासून बौद्ध धर्मावर विश्वास होता. या धर्माचा प्रसार करण्यात त्याने कोणतीही कसर सोडली नाही. खरे तर, सुत्तनीपाताच्या अट्ठकथेतील पब्बजा सुत्त वाचल्यावर कळते की बिंबिसारने भिक्षु गौतम बुद्धांना पहिल्यांदा पांडव पर्वताखाली पाहिले होते. यानंतर त्यांना आपल्या महालात बोलावले होते. मात्र गौतम बुद्धांनी त्यांचे आमंत्रण स्वीकारले नव्हते आणि ते स्वत:च्या मार्गाने पुढे जात राहिले. यानंतर बिंबिसारने बौद्ध धर्माचा प्रसार करण्यासाठी शक्य ते सर्व केले. तथापि, यादरम्यान त्यांची भेट चेल्लमाशी झाली, जी नंतर त्यांची पत्नी झाली. चेल्लमा जैन धर्मावर विश्वास ठेवत होती आणि दररोज या धर्माची शिकवणी वाचत असे. सम्राट बिंबिसार या शिकवणीने इतका प्रभावित झाला की त्याने जैन धर्म स्वीकारला आणि नंतर आपली राजधानी मगधहून उज्जैनला हलवली.

## हजारो पक्षांच्या मृत्यूने शिकागो भयभीत



अमेरिकेतील शिकागोमधून एक धक्कादायक घटना समोर आली. चार आणि पाच ऑक्टोबरदरम्यान येथे हजारो पक्षी उडून गेले; मात्र दुसऱ्याच दिवशी रस्त्यावर किमान एक हजार पक्षी मृतावस्थेत आढळले. ते पाहून आजूबाजूचे लोक भयभीत झाले. टेनेसी वार्बलर्स, हर्मिट थ्रश, अमेरिकन वुडकॉक यांच्यासह अनेक प्रजातींचे पक्षी जमिनीवर मृतावस्थेत आढळून आल्याचे सांगण्यात येत आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात पक्ष्यांच्या मृत्यूने अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत.

हे सर्व पक्षी इमारतीवर आदळले आणि जखमी झाल्यानंतर जमिनीवर पडले. त्यामुळे त्यांचा मृत्यू झाला. चार आणि पाच ऑक्टोबरला कुक काउंटीमध्ये किमान १.५ दशलक्ष पक्षी दिसले. काही इंटरनेट वापरकर्त्यांनी असेही म्हटले आहे की काचेच्या इमारतीला धडकल्याने त्यांचा मृत्यू झाला. पक्ष्यांच्या मृतदेहांच्या ढिगाऱ्याचा फोटोही 'सोशल मीडिया'वर व्हायरल होत आहे. ते पाहून सगळेच हैराण झाले आहेत. कोणी तरी गालिचा पसरल्याप्रमाणे पक्ष्यांचे मृतदेह रस्त्यावर विखुरले होते. मिळालेल्या माहितीनुसार, अद्याप सर्व पक्ष्यांचे मृतदेह बाहेर काढण्यात आलेले नाहीत. शेकडो मृतदेह बाहेर काढणे बाकी आहे. पक्ष्यांचे अवशेष शोधण्याचे काम सुरू आहे.

दरम्यान, 'युनिव्हर्सिटी ऑफ वेस्टर्न ऑन्टारियो'चे संशोधक ब्रेंडन सॅम्युअल्स म्हणतात की प्रत्येक पक्षी इमारतीच्या खिडकीला आदळून मरू शकत नाही. या घटनेत किती पक्षी बाधित झाले, याचा नेमका आकडा काही दिवसांमध्ये कळेल. कारण आजही आजूबाजूच्या परिसरात पक्ष्यांचे मृतदेह गोळा करण्याचे काम स्वयंसेवक करत आहेत. स्थलांतराच्या शिखर काळात विविध कारणांमुळे मोठ्या संख्येने पक्षी आपला जीव गमावतात. विरुद्ध दिशेला वाहणारा वारा, धुके, पाऊस आणि प्रदूषण यासारखी परिस्थिती या पक्ष्यांसाठी कधी कधी खूप आव्हानात्मक बनते.

## तापमानवाढीवर असाही उपाय



जागतिक तापमानवाढ ही खूप मोठी समस्या आहे. जगभरातल्या विविध देशांमधलं तापमान वाढत चाललं आहे. कतारमध्येही उष्णतेने कहर केला आहे. कतार हा जगातल्या उष्ण देशांपैकी एक. कतारची राजधानी दोहामधले नागरिक उन्हाच्या झळांमुळे हैराण झाले आहेत. या झळांमुळे हैराण झालेल्या नागरिकांना दिलासा देण्यासाठी दोहा इथल्या सार्वजनिक ठिकाणी एसी बसवले जात आहेत. इतकंच नाही तर उन्हाची तीव्रता कमी करण्यासाठी रस्त्यांना निळ्या रंगात रंगवलं जात आहे. दोहा इथलं तापमान ४६ अंशांवर पोहोचलं आहे. म्हणूनच इथल्या प्रशासनाने सार्वजनिक ठिकाणी वातानुकुलीत यंत्र बसवण्याचा निर्णय घेतला आहे. दोह्यातली सर्वात मोठ्या बाजारपेठेजवळचे रस्ते निळ्या रंगाने रंगवले जात आहेत. काळ्या रंगाच्या तुलनेत निळा रंग उष्णता कमी प्रमाणात शोषत असल्यामुळे हा उपाय करण्यात आला आहे. कतारमध्ये कार्बन उत्सर्जन मोठ्या प्रमाणात होतं. अमेरिकेपेक्षाही इथे अधिक प्रमाणात कार्बन उत्सर्जन होतं. मात्र शहरात एसी बसवल्यामुळे इथल्या कार्बन उत्सर्जनात अधिक वाढ होईल, असं तज्ज्ञांचं म्हणणं आहे. अशाप्रकारे एसी बसवणं हा तात्पुरता उपाय आहे. यामुळे तापमानवाढीची समस्या दूर होणार नाही, असं इथल्या तज्ज्ञांचं म्हणणं आहे. त्यामुळे जागतिक तापमानवाढीची समस्या सोडवण्यासाठी काही ठोस उपाय करण्याची गरज व्यक्त होते आहे.

## हँगओव्हर उतरवायला निघाला आणि

ब्रिटनच्या बार्ने रुलला मद्यपान केल्यामुळे चांगलाच हँगओव्हर झाला. मद्याचा अंमल कमी करण्यासाठी त्याने चालायचं ठरवलं. त्याचा हा प्रवास संपलेला नाही. तब्बल ८०० किलोमीटरचा प्रवास करून तो फ्रान्समध्ये दाखल झाला. मद्याचा अंमल उतरवण्यासाठी चालणं सुरू केल्यावर आपल्याला खूप बरं वाटलं. यामुळे आपण चालणं सुरूच ठेवल्याचं बार्ने सांगतो. हँगओव्हर झाल्यानंतर थोडं चालून येऊ असा विचार करून बार्ने चालायला लागला. थोडा भानावर आला तेव्हा बार्नेने २१ किलोमीटर अंतर कापलं होतं. यानंतर मागे वळून पहायचं नाही, चालत रहायचं असं त्याने ठरवलं. बार्नेने प्रत्येक दिवशी जवळपास २१ किलोमीटर अंतर कापलं. या प्रवासाचा सगळा खर्च त्यानेच उचलला आहे. बार्नेने एका बिअर बारमध्ये नोकरी करून थोडीफार बचत केली होती. त्याच पैशातून त्याने हा खर्च भागवला. या प्रवासादरम्यान आपण अनुभवसंपन्न झाल्याचं बार्ने सांगतो. तो या काळात स्पॅनिश व फ्रेंच भाषा शिकला. बऱ्याच लोकांना भेटला. आता या पुढे प्रवास हेच आपल्या आयुष्याचं ध्येय असेल असं त्याने म्हटलं आहे. तो हा प्रवास शब्दबद्ध करणार आहे. या प्रवासवर्णनातून इतरांनाही प्रेरणा मिळेल, असं त्याला वाटतं. बार्नेचा हा प्रवास अनोखाच म्हटला पाहिजे.



## सापाच्या शेतीतून गाव बनले श्रीमंत!

शेतीला ग्रामीण अर्थव्यवस्थेचा अविभाज्य भाग म्हटले जाते. पूर्वी लोकांच्या हाताला काम नसायचे तेव्हा ते शेतीवर उदरनिर्वाह करायचे. आजच्या प्रगत तंत्रज्ञामुळे लोक आधुनिक पद्धतीने शेती करत आहेत. त्यातून ते लाखो-करोडो रुपये कमावतात. लोक विविध फळांची, फुलांची आणि भाज्यांची शेती करत आहेत; पण जगात असे एक गाव आहे, जिथे चक्क सापांची शेती केली जाते. महत्त्वाचे म्हणजे यातून गावातील सर्व शेतकरी श्रीमंत बनले आहेत.

चीनमधील झेजियांग प्रांतातील जिसिकियाओ गावातील लोक साप पाळून आपला उदरनिर्वाह चालवतात. या गावातील प्रत्येक व्यक्ती याच व्यवसायावर अवलंबून आहे. या गावात लाखो विषारी साप पाळले जातात. या गावातील लोक किंग कोबरापासून अजगरापर्यंत विविध प्रकारचे साप पाळतात. या गावातील लोक मांस आणि शरीराच्या अन्य भागांसाठी त्यांची शेती करतात. या गावातील सापांना अमेरिका, रशियासह कोरिया, जर्मनासारख्या अनेक देशांमध्ये मोठी मागणी आहे. चीनमध्ये सापाचे मांस अतिशय आवडीने खाल्ले जाते. याशिवाय औषध बनवण्यासाठी सापाचे अवयव वापरले जातात. अनेक प्रजातींचे साप पिशव्या, शूज आणि बेल्ट इत्यादी बनवण्यासाठी वापरले जातात. या गावात लाकूड आणि काचेच्या छोट्या पेटीत साप पाळले जातात. सापाची पिल्ले मोठी झाल्यावर त्यांना एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेण्यासाठी प्लास्टिक पिशव्यांचा वापर केला जातो.





मोठे झाल्यावर सापांना मारण्यासाठी फार्म हाऊसच्या बाहेर नेले जाते. सर्व प्रथम त्यांचे विष बाहेर काढले जाते. त्यानंतर त्याचे डोके कापले जाते. त्यांचे मांस बाहेर काढून बाजूला ठेवतात. सापाची कातडी सुकवण्यासाठी वेगळी ठेवली जाते आणि मांसापासून औषध बनवले जाते. बाजारात या चामड्याचे पदार्थ खूप महाग विकले जातात. त्यामुळे यातून हे लोक चांगले पैसेही कमावतात. जिसिकियाओ गावात ३० लाखांहून अधिक साप पाळले जातात. या गावात १९८० पासून साप पालनाचा व्यवसाय केला जातो. भारतात मात्र साप पालनावर बंदी आहे. त्याचे विष काढण्यास कायदेशीर परवानगी नाही. यामुळे भारतात सापांची तस्करी, सापांच्या विषाच्या तस्करीविरोधात गुन्हेही दाखल होतात.




# बाहेरचे पार्सल परत न्या..




## संतप्त कार्यकर्त्यांनी रोखला प्रदेशाध्यक्ष पटोलेंचा ताफा

■ **महासागर प्रतिनिधी, गोंदिया, दि. २८ :** जिल्ह्याच्या अर्जुनी मोरगाव विधानसभा मतदारसंघातून काँग्रेसची उमेदवारी मिळालेले माजी आमदार दिलीप बन्सोड यांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी आलेले काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, खासदार डॉ. प्रशांत पडोळे आणि उमेदवार दिलीप बनसोड यांच्या ताफ्याला संतप्त कार्यकर्त्यांनी अडवून त्यांना परत जाण्यास सांगितले. यावेळी पटोले यांना कार्यकर्त्यांच्या रोषाला सामोरे जावे लागले.

बाहेरच्या उमेदवाराला तिकीट दिल्याने संतप्त झालेल्या स्थानिक काँग्रेस कार्यकर्त्यांनी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले आणि डॉ. प्रशांत पडोळे यांच्या ताफ्यावर हल्ला केला. निवडणूक थांबवून बाहेरून आणलेले पार्सल परत न्याचे, स्थानिक नेत्यांना निवडणूक लढवण्याची संधी द्यावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

दिलीप बन्सोड हे पूर्वी तिरोडा मतदारसंघातून राष्ट्रवादीचे आमदार होते . काही वर्षापूर्वी त्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला . तिरोडा मतदारसंघ खुला झाल्याने बन्सोड यांना अर्जूनी मोरगावमधून काँग्रेसने उमेदवारी दिली आहे .

## बच्चू कडू यांचे नामांकन सादर

■ **महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, दि. २८ :**
अचलपूर विधानसभा मतदारसंघातील तिसऱ्या आघाडीचे प्रवरणा महाशक्तीचे अधिकृत उमेदवार व प्रहार जनशक्ती पक्षाचे संस्थापक बच्चू कडू यांनी सोमवारी हजारो कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत उमेदवारी अर्ज दाखल केला.



बच्चू कडू यांचेही भव्य रॅली विरोधकांच्या छातीवर फुंकर घालणारी ठरली. रॅलीत कामगार, शेतमजूर, शेतकरी उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते. सोमवारी बच्चू कडू यांच्या रॅलीने टेबले फिरवली. सकाळपासूनच अचलपूर, चांदूर बाजारपेठेतील कामगार व शेतकरी अचलपूरच्या गांधीपूलमध्ये उपस्थित होते. वसुबारस हा शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचा दिवस आहे, आज वसुबारस दिनानिमित्त बच्चू कडू यांनी आपला उमेदवारी अर्ज सादर केला.

## तिकीट कापले... वनगा रडले...

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २८ :**
शिंदे गटाने पालघर मतदारसंघात श्रीनिवास वनगा यांना डावलून राजेंद्र गावित यांनी उमेदवारी दिली आहे. उमेदवारी न मिळाल्याने श्रीनिवास वनगा दुःखी झाले असून त्यांनी कालपासून अन्न पाण्याला हात लावला नाही. ते आत्महत्या करण्याचा विचार करत आहेत, अशी माहिती त्यांच्या पत्नी सुमन वनगा यांनी दिली.

वनगा यांनी शिंदे यांच्यावर तोंडसुख घेतले असून, उद्धव ठाकरेंची स्तुती केली आहे.




■ **राजकारण** : डॉ. भालचंद्र कांगो, भागा वरखडे, भाष्कर खंडागळे यांचे विश्लेषण

■ **आरोग्य : आरोग्यापुढचे धोके आणि वाढते अनारोग्य**
डॉ. सतिश सोनवणे, डॉ. अभिजीत वैद्य, डॉ. संपत केदारे, डॉ. कुंदन गायकवाड, प्रा. शिला गाडे, डॉ. राकेश शेट्टी यांची अत्यंत उद्बोधक माहिती.

**पैसा नेमका किती हवा?** पैशाचे महत्व विशद करणारा परिसंवाद

■ **पर्यावरण : निसर्ग सूड उगवतो काय?**
डॉ. मधुकर पाचुलकर, पर्यावरण तज्ज्ञ, वैजयंती कुळकर्णी, पर्यावरण अभ्यासक, डॉ. किरण कुळकर्णी, पर्यावरण तज्ज्ञ यांची अभ्यासपूर्ण माहिती.

■ **ग्राहक** : ग्राहकांना सावधान करणारा श्रीराम झंवर यांचा अभ्यासपूर्ण लेख

**: मधल्या पिढीच्या समस्या :**
मेघा ईनामदार, स्वाती पेशवे

**: मराठी गझलेतील नवी वळणे :**
गझलकार भुषण कटककर

**राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची शंभरी** : वासुदेव कुळकर्णी यांचा वाचनीय लेख

**: मराठा आरक्षणाचा प्रश्न आणि रोजगाराचे संकट :**
वरिष्ठ पत्रकार मिलींद किर्ती यांचे विश्लेषण

**४** वाचनीय कथा

:मुल्य: रू.१२५/-

■ **भरगच्च आणि दर्जेदार साहित्याचा नजराणा** ■

वितरकांनी आपली मागणी आजच नोंदवावी, जेणेकरून तेवढ्या प्रती पाठविता येतील.

पुरण शुंकर ८८८८६४७७५३

## माजी मंत्री अनीस अहमद वंचितमध्ये दाखल

# नागपुरात काँग्रेसला धक्का

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. २८ :**
विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर नागपुरात काँग्रेस पक्षाला मोठा धक्का बसला आहे. तिकीट न मिळाल्याने नाराज झालेल्या माजी मंत्री अनीस अहमद यांनी काँग्रेस पक्षाचा राजीनामा देऊन वंचित बहुजन आघाडीत प्रवेश केला आहे.

मुंबईत आयोजित कार्यक्रमात आवंचितचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी त्यांना पक्षाचे सदस्यत्व मिळवून दिले. यासोबतच वंचित यांनी त्यांना मध्य नागपुरातून उमेदवार म्हणून घोषित केले आहे. अनीस अहमद हे काँग्रेस पक्षाचे मोठे मुस्लिम नेते मानले जातात.

ते मध्य नागपूर विधानसभा मतदारसंघातून तीन वेळा आमदार आणि २००४ ते २००९ या काळात महाराष्ट्र सरकारमध्ये मंत्री राहिले आहेत.

अहमद हे मध्य नागपुरातून काँग्रेसकडून तिकीट मागत होते. मात्र, गेल्या निवडणुकीत पक्षाचा चार हजार मतांनी पराभव झाला. शेळके यांना पुन्हा उमेदवारी जाहीर करण्यात आली. त्यामुळे संतापलेल्या अहमद यांनी पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा दिला. त्यांनी आपला राजीनामा पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्याकडे पाठवला आहे. मंगळवार हा उमेदवारी दाखल करण्याचा शेवटचा दिवस असून ते नामांकन सादर करतील.



### अनेक मतदारसंघात बंडखोरीचा धोका

काँग्रेसकडून तिकीट वाटप करताना मोठा घोळ झाल्याचे अनेक नाराज पदाधिकारी सांगतात. मध्य नागपूरमधून सर्वाधिक ३० इच्छुकांनी अर्ज भरले होते. त्यात, मुस्लीम आणि हलबा प्रवर्गातील इच्छुकांची संख्या अधिक होती. मात्र, बंटी शेळकेंना उमेदवारी दिल्याने येथे बंडखोरी अटळ आहे. पूर्व नागपूरमधून पुरूषोत्तम हजारे यांनी उमेदवारी भरली आहे. तिकडे भंडारा मतदारसंघात पुजा ठवकर यांना उमेदवारी दिल्याने अनेक निष्ठावंत संतापले असून येथेही बंडखोरीची शक्यता आहे.

## दादाराव केचे यांचीही बंडखोरी



■ **महासागर प्रतिनिधी**
**वर्धा, दि. २८ :**
भारतीय जनता पक्षाने विधानसभा निवडणुकीसाठी चौथी यादी जाहीर केली आहे. भाजपने २५ उमेदवारांच्या यादीत तीन आमदारांचा समावेश केला आहे.

भाजपाकडून काही विद्यमान आमदारांची तिकिटे रद्द करण्यात आली आहेत. तिकीट रद्द करणाऱ्यांमध्ये आर्वी मतदारसंघाचे दादाराव केचे यांच्या नावाचाही समावेश आहे. तिकीट कापताच केचे यांनी बंडखोरीचा पवित्रा घेत अपक्ष उमेदवार म्हणून निवडणुकीच्या रिंगणात दंड थोपटले आहेत. पक्षाचे भले करून मी चुकीचे केले, या शब्दात त्यांनी पक्षावर तोफ डागली.

केचे हे आर्वी विधानसभा मतदारसंघातून दोन वेळा भाजपचे आमदार आहेत. २००९ आणि २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत त्यांनी विजय मिळवला. यावेळी त्यांना पक्षांतर्गत आव्हान होते. केचे आणि फडणवीस यांचे सहकारी सुमित वानखेडे यांच्यात तिकीटासाठी लढत होती. तिकीट मिळविण्यासाठी केचे यांनी शथीर्चे प्रयत्न केले, मात्र अखेर भाजपने वानखेडे यांच्या नावाला मंजुरी दिली.

दरम्यान, गेल्या अनेक महिन्यांपासून वानखेडे हे या मतदारसंघाचे भाजपाचे उमेदवार असतील अशी अटकळ लावली जात होती. अखेर त्यांच्या नावावर भाजपाने शिक्कामोर्तब केले.

## दोन मिनिटांचा उशीर आणि अधिकाऱ्यांचा नकार



■ **महासागर प्रतिनिधी**
**काटोल, दि. २८ :**
काटोल विधानसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार) नेते व माजी गृहमंत्री अनिल देशमख यांना पक्षाने उमेदवारी दिली असली तरी त्यांच्याऐवजी त्यांचे पुत्र सलील हे सोमवारी उमेदवारी अर्ज दाखल करणार होते.

मात्र, त्यांच्या उमेदवारी अर्ज दाखल करताना असा काही प्रकार घडला की ते अर्ज भरूच शकले नाही. त्यांनी आता मंगळवारी अर्ज दाखल करण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, यामागे काहीतरी राजकीय खेळी असल्याचा संशय उपस्थित केला जात आहे. याचे कारण काय असू शकते यावर चर्चा सुरू आहे.

अनिल देशमुख यांच्या माघारीने या मतदारसंघातील राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता आहे. १९९५ ते २०१९ या काळात फक्त २०१४ चा अपवाद वगळता अनिल देशमुख काटोल मतदारसंघातून विजयी होत आले. काटोल हा देशमुखांचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जातो. त्यामुळेच पक्षाने त्यांना २०२४ मध्ये पुन्हा उमेदवारी दिली होती. पक्षाच्या पहिल्याच यादीत देशमुख यांचे नाव होते. पण दुसऱ्याच दिवशी अनिल देशमुख यांनी ते स्वतः लढणार की पुत्र सलील लढणार याबाबत दोन दिवसात निर्णय घेऊ, असे स्पष्ट केले होते.

रविवारी समाजमाध्यमांवर सलील देशमुख यांचे चला उमेदवारी अर्ज भरायला हे आवाहन प्रसारित झाल्याने तर्कवितर्कला उधाण आले होते. ोमवारी सकाळी ११ वाजता काटोल उपविभागीय कार्यालयात सलील देशमुख अर्ज भरणार असल्याचे कळवण्यात आले होते. अर्ज भरण्याआधी भव्य रॅली काढण्यात आली. या रॅलीमध्ये मोठी गर्दी झाली होती. गर्दीमधून अर्ज भरण्यासाठी जाणे सलील देशमुख यांना कठीण झाले. त्यांनी अर्ज भरण्यासाठी घेतलेल्या परवानगीच्या वेळेत ते पोहचू शकले नाही. त्यांना फक्त दोन मिनिटे उशीर झाल्याने त्यांना अर्ज दाखल करता आला नाही.

## ७ कोटी ५३ लाख रुपयांचे सोने जप्त

■ **वृत्तसंस्था, सातारा, दि. २८:**
तासवडे टोल नाक्यावर निवडणूक आयोगाच्या पथकाने तपासणी दरम्यान सोन्या-चांदीच्या वस्तू जप्त केल्या आहेत. याबाबत पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. यात तब्बल ७ कोटी ५३ लाख रुपयांचे सोने जप्त करण्यात आले.

२७ ऑक्टोबर रोजी सायंकाळी कराड ते सातारा रस्त्यावरील तासवडे टोल नाक्यावर कुरिअर वाहतूक करणारी गाडी अडवण्यात आली. वाहनाच्या इनवाइसची तपासणी केल्यावर त्यात सोन्या-चांदीचे दागिने असल्याचे आढळले. या वस्तू इनवाइस प्रमाणे आहेत की नाही याची खात्री करण्यासाठी, सदर गाडी तळबीड पोलिस ठाण्यात सीसीटीव्ही निगराणीखाली सुरक्षित ठेवण्यात आली, ज्यामध्ये विविध तपासणी पथकांचे सहकार्य घेण्यात आले.

तपासणीमध्ये ९ किलो ३९०ग्रॅम सोने आणि ६० किलो चांदी असल्याचे निष्पन्न झाले, ज्याची अंदाजे किंमत ७ कोटी ५३लाख रुपये आहे. सध्या आयकर विभागाकडून इनवाइसची पडताळणी सुरू आहे. दागिने पोलीस संरक्षणाखाली सुरक्षितपणे वाहनात ठेवलेले आहेत. कराड उत्तर पथकाने या वाहनाची कोषागारात सुरक्षितपणे नेण्याची जबाबदारी घेतली आहे .






नागपूर
महासागर वृत्तसागर
मंगळवार, दि. २९ ऑक्टोबर २०२४



# खासगी ट्रॅव्हल्सकडून ऐन सणासुदीत भाडेवाढ



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २८ :
दिवाळीचे निमित्त दरवर्षीप्रमाणे यंदाही ट्रॅव्हल्सचालकांनी प्रवासी भाड्यात तब्बल दुपटीने वाढ केली आहे. खासगी ट्रॅव्हल्सचालकांच्या या मनमानीमुळे प्रवाशांना मोठा आर्थिक फटका बसतोय. दिवाळीच्या सणात अतिरिक्त नफा खिशात घालण्यासाठी खाजगी व्यावसायिक गर्दी पाहून भाडे ठरवित आहेत. नागपूर ते मध्यप्रदेश यासह पुणे, मुंबईकडे जाणाऱ्या खासगी ट्रॅव्हल कंपन्यानी 20 टक्क्यांनी वाढ केली आहे. दिवाळीच्या तीन दिवसात ट्रॅव्हल्सचालकांनी ही दरवाढ आणखी वाढण्याची शक्यता वर्तविली आहे.

शहरातून दररोज सुमारे ५० पेक्षा जास्त गाड्या प्रमुख शहरांमध्ये धावतात. सणानिमित्त मेट्रोसिटीमध्ये नोकरीस असलेले किंवा कामगार मोठ्या प्रमाणात आपआपल्या गावाकडे प्रवाशी ये जा करत असतात. यासाठी लांब पल्ल्यांच्या प्रवासासाठी प्रवासी स्लीपर आणि वातानुकूलित गाड्यांना प्राधान्य देतात.

एसटी महामंडळाकडून स्लीपरगाड्यांची सुविधा पुरविली जात नाही तर रेल्वे गाड्यांचे आरक्षण फुल्ल झालेले असते. त्यामुळे प्रवाशांना दुप्पट, तिप्पट भाडे देऊन प्रवास करावा लागत असल्याचे चित्र आहे. ऑनलाइन तिकिटाच्या नावावरही ट्रॅव्हल्स कंपन्यांकडून प्रवाशांचा छळ केला जाताना दिसतो.

# दिवाळी निमित्त बाजारपेठांमध्ये खरेदीसाठी ग्राहकांची उसळली प्रचंड गर्दी



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २८ :
दिवाळीत सर्व बाजारपेठांमध्ये ग्राहकांची खरेदीसाठी प्रचंड गर्दी आहे.महाल, इतवारी, गांधीबाग, सीताबर्डी या बाजारात पाय ठेवायलाही जागा नाही.दिवाळीत सर्व बाजारपेठांमध्ये ग्राहकांची खरेदीसाठी प्रचंड गर्दी आहे.

महाल, इतवारी, गांधीबाग, सीताबर्डी या बाजारात पाय ठेवायलाही जागा नाही. आर्थिक मंदी असल्याचे म्हटले जाते. पण तोरणे,कंदील, पणत्या, शोभिवंत वस्तू, रांगोळी, फराळ,सुका मेवा, कपडे यांची रेलचेल आणि हे खरेदी करण्यासाठी बाजारांमध्ये तितकीच गर्दी उसळलेली दिसत आहे.

प्लास्टिकच्या तुलनेत कागदी हे कंदील महाग आहेत मात्र तरीही हेच कंदील लोकांच्या पसंतीला उतरत आहेत.इलेक्ट्रिक सामानाची बाजारपेठ रंगीबेरंगी तोरणांनी सजली आहे. तोरणासोबत, लाईट, क्रिस्टल दिवे, लटकते दिवे अशा अनेक प्रकारच्या दिव्यांचा लखलखाट पसरला आहे.

कर्टन्स लाईट, थ्रेड लाईट, फायबर बॉल्स अशा दिव्यांची नवीन तोरणे बाजारात असली तरी जुन्या रंगीबेरंगी तोरणांना अधिक मागणी आहे.

मार्केटमध्ये विविध रंगाच्या मोत्यांच्या-खड्यांच्या लेस, दागिने, कपडे, पूजासाहित्य, देवादिकांच्या मूर्ती, भांडी आदी सर्वकाही मिळते.दिवाळीत तिखट गोड फराळ करण्याची आणि घराघरात वाटण्याची परंपरा आहे. खमंग चकल्या, चविष्ट चिवडा, गोड लाडू, खुसखुशीत शंकरपाळे, मिठाईचे पदार्थ घरी बनविले जातात.

मात्र वेळेअभावी सध्या फराळही बाजारातून खरेदी करण्याचा ट्रेंड वाढत आहे. पारंपरिक पोह्याच्या चिवड्यापासून ते मका चिवडा, चकली, शंकरपाळी, करंजी, अनारसे, शेव, लाडू आदी पदार्थ इतवारीत मिळतात. काळानुरूप दिवाळी साजरी करण्यात काही बदल जाणवत आहे. पण नागपूरची दिवाळी वेगळीच असते, हे विशेष आहे.

# ग्रामायण प्रतिष्ठानतर्फे अभ्युदय सेवा कार्याचे निःशुल्क प्रदर्शन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २८ :
ग्रामायण प्रतिष्ठान सेवा संस्थांना अधिक सशक्त करणासाठी सदैव प्रयत्नरत असते. यावेळी ग्रामायण एक अनोखा उपक्रम आयोजित करीत आहे.

अभ्युदयः सेवा कायार्चे निःशुल्क प्रदर्शन चांगल्या कामांना समाजाची साथ! या प्रदर्शनात महाराष्ट्रातील सर्व प्रकारच्या सेवा संस्थांना आमंत्रित करण्यात आले आहे. अनेक संस्था गुगल फॉर्म भरून या उपक्रमात सहभागी झाल्या. ग्रामायण समितीने निवडलेल्या संस्थांना प्रदर्शनात येण्याचे निमंत्रण देण्यात येईल.

सेवा प्रदर्शनात निवड झालेल्या संस्थेला निःशुल्क स्टॉल देण्यात येईल. या निःशुल्क प्रदर्शनात विविध संस्थांचे डायरेक्टर, समाजातील देणगीदार, हितचिंतक भेट देतील. प्रदर्शनात इरह,टरह महाविद्यालयाचे विद्यार्थी भेट देतील.

संस्थेच्या आवश्यकते नुसार विद्यार्थ्यांचा इंटरव्हयु घेण्याची व्यवस्था करण्यात येईल. विद्यार्थ्यांना पण एकाच ठिकाणी अनेक संस्थांची कामं समजून घेता येतील. संस्थांचा व देणगीदारांचा प्रत्यक्ष संवाद घडवून आणण्याचा ग्रामायण प्रतिष्ठानचा हा उपक्रम आहे. 9 व 10 नोव्हेंबर 20 24 या दोन दिवसात दुपारी 12 ते 9 या वेळेत हे प्रदर्शन तात्या टोपे सभागृह, सुरेंद्रनगर, नागपूर येथे सुरू राहील.

नागपूर मध्ये पहिल्यांदाच होत असणाऱ्या या प्रकारच्या उपक्रमाला नागरिकांनी देखील भेट देऊन समाजात चालणाऱ्या विविध सेवा कायार्ची ओळख करून घ्यावी असे आवाहन ग्रामायण प्रतिष्ठानने केले आहे.

# शहीद पोलिस हवालदार ए.एस. वाघमारे यांना श्रद्धांजली



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २८ :
सशस्त्र पोलिस हवालदार ए.एस. वाघमारे भामरागड जि. गडचिरोली येथे दि. १२/०५/१९८९ रोजी भामरागड जि. गडचिरोली येथे कर्तव्यार्थ असताना शहीद झालेले राज्य राखीव पोलिस बल गट क्र. ४, नागपूर आस्थापनेवरील जवान यांना पोलीस शहीद दिनानिमित्त श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

त्यावेळी कार्यक्रमाचे आयोजक डॉ. प्रियंका नारनवरे ममादेशक रा.रा.पो.बल गट क्र.४, नागपर कार्यक्रमाचे मार्गदर्शक अपर पोलिस महासंचालक चिरंजीव प्रसाद सदर कार्यक्रमाचे आयोजन इमामवाडा पोलीस स्टेशन येथे शहिद अशोक वाघमारे यांचा श्रद्धांजली कार्यक्रम घेण्यात आला कार्यक्रमाला पोलीस स्टेशनचे ढरक्बडे यांच्या हस्ते शाहिदाची पत्नी संघमित्रा अशोक वाघमारे यांना स्मुर्ती चिन्ह पुरस्कार देण्यात आला. त्यावेळी संपूर्ण वाघमारे कुटुंब उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन ढरकपवार यांनी केले.

# इंडियन जिमखाना क्लब धंतोली यांची वार्षिक १०१ वी आमसभा




■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २८ :
इंडियन जिमखाना क्लब धंतोली नागपूर यांचे वार्षिक आमसभा जिमखाना क्लब धंतोली येथे क्लबच्या हॉल मध्ये रविवारी 27 ऑक्टोबर रोजी पार पडली. जिमखाना क्लबचे अध्यक्ष शरद दुरागकर यांच्या अध्यक्षतेखाली क्लबचे सचिव विलास हरडे यांनी दीपप्रज्वलन करून गणपतीच्या फोटोला हार घालून सन 2023-24 चा वार्षिक अहवाल सादर केला.

कोषाध्यक्ष बिपिन बोंडे यांनी आर्थिक अहवाल सादर केला. व विलास हरडे यांनी क्लब मध्ये झालेले व्यवहार व तसेच क्लब मध्ये झालेल्या अचीवमेंट, डेव्हलपमेंट व पुढील अनेक वषार्चे नियोजन व आणखीन प्रगती कशी करू याबद्दल आमसभेला माहिती दिली.

तसेच सभेत माजी अध्यक्ष चंद्रकांत गुंडेवार व अन्य पदाधिकारी प्रवीण तुराटे, विनय झाडे, अभय क्षीरसागर, चंद्रकांत येवले, डॉ.ए.आर. आंबईकर, सुनीत माहेश्वरी, जयंत कुळकर्णी, राजकुमार कोठारी आणि सभेला क्लबची सभासद अनिल वडपल्लीवार, घनश्याम राठी, राजीव जगताप, अनिल केडिया, तेलंग, प्रशांत पाध्ये व अन्य मानवाईक व्यक्ती आणि कर्मचारी उपस्थित होते.

# मध्य रेल्वे नागपूर विभागाकडून चंद्रपूर स्थानकावर एचआरएमएस/यूएमआयडी आरोग्य तपासणी शिबिर




■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २८ :
मध्य रेल्वे नागपूर विभागाने २५ ऑक्टोबर २०२४ रोजी चंद्रपूर स्थानकावर ३३वे एचआरएमएस/यूएमआयडी आणि आरोग्य तपासणी शिबिर यशस्वीरित्या आयोजित केले. मंडल रेल्वे व्यवस्थापक मनीष अग्रवाल यांच्या नेतृत्वाखाली हे शिबिर कर्मचारी कल्याण आणि तक्रार निवारणासाठी विभागाची कटिबद्धता दर्शवते.

हे शिबिर चंद्रपूर आणि आजूबाजूच्या स्थानकातील फील्ड कर्मचाऱ्यांसाठी होते, ज्यात सीटीटीआय, सहाय्यक, ट्रॅक मेंटेनर, तंत्रज्ञ, स्टेशन मास्टर आणि सेक्शन इंजिनिअर यांचा समावेश होता. शिबिरामध्ये एचआर एमएस/यूएमआयडी प्रणालीमध्ये सेवा रेकॉर्ड आणि कौटुंबिक माहिती अद्यतनित करणे या विविध सेवा-संबंधित तक्रारींचे निराकरण करण्यात आले. शिबिरात नोंदवलेल्या सर्व तक्रारींवर वेळेवर उपाय केले जातील.

तक्रार निवारणासोबतच, शिबिरामध्ये रक्त नमुना संग्रह, डोळ्यांची तपासणी आणि रक्तदाब मापन यासारख्या निवारक आरोग्य तपासण्यांचा समावेश होता. हे शिबिर मुख्य वैद्यकीय अधीक्षक श्री. जी. एस. मंजुनाथ आणि वरिष्ठ विभागीय कार्मिक अधिकारी श्रीमती संजी जैन यांच्या मार्गदर्शनाखाली झाले.

कर्मचारी कल्याणावर भर देत, नागपूर विभागाने इतर ठिकाणीही एचआरएमएस/यूएमआयडी आणि तक्रार निवारण शिबिराचे नियोजन केले आहे. पुढील शिबिर २२ नोव्हेंबर २०२४ रोजी धामणगाव स्थानकावर आयोजित होईल. नागपूर विभाग दुर्गम भागातील कर्मचाऱ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी आणि त्यांच्या समस्या तत्काळ सोडवण्यासाठी सतत प्रयत्नशील आहे.

# सोडा सारे काम धाम, अवश्य करा मतदान



■ महासागर प्रतिनिधी
बेला, दि. २८ :
विमलताई तिडके विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचे वतीने गावात रॅली काढून मतदार जागृती करण्यात आली. शाळेतील कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य राजेंद्र तिडके होते. शिक्षक भिमसागर मुन व प्रा. रवीकर गायकवाड यावेळी प्रामुख्याने उपस्थित होते. प्रा. रविदास उरकुडे यांनी सूत्रसंचालन केले.

लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी मतदान करणे आवश्यक आहे.त्याकडे मतदारांनी कानाडोळा करू नये. याबाबत विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर करून मतदार जागृती केली. रॅलीतून शालेय मुलामुलींनी ' सोडा सारे काम धाम, अवश्य करा मतदान. मनापासून मत द्या, अभिमानाने मतदान करा. लोकशाहीची ताकद,तुमच्या मतदानात आहे.

तुमचे एक मत, करेल लोकशाहीला बळकट.'ढोल ताशा वाजवत असे जोरजोराने नारे देऊन गावकऱ्यांचे लक्ष वेधले.रॅली व मतदार जागृतीचे यशस्वीतीसाठी शाळेतील शिक्षक शिक्षिका व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## अजनी ओएसएम डेपोचे निरीक्षण

नागपूर : स्वच्छ भारत अभियानाच्या अंतर्गत मुख्य विद्युत सेवा अभियंता, मुंबई यांनी अजनी ओएसएम डेपोचे निरीक्षण केले आणि वृक्षारोपण मोहीम राबवली. निरीक्षणा दरम्यान, डेपोतील विविध सुविधा आणि स्वच्छतेचे उच्च मानके तपासले गेले, ज्यामुळे पर्यावरणाची जबाबदारी आणि स्वच्छता सुनिश्चित करता येईल. निरीक्षणानंतर, डेपो परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करण्यात आला, जो आरोग्यदायी आणि शाश्वत कार्य वातावरण निर्माण करण्याची वचनबद्धता दर्शवतो.

याप्रसंगी नागपूर येथील वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता प्रतिभा गुप्ता, सहायक विभागीय विद्युत अभियंता संजीव मानकर, तसेच इतर पर्यवेक्षक आणि कर्मचारी उपस्थित होते. त्यांच्या सक्रिय सहभागामुळे रेल्वे कर्मचाऱ्यांचे स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धनाच्या मूल्यांप्रती असलेले निष्ठा अधोरेखित होते, जे स्वच्छ भारत अभियानाच्या स्वच्छ आणि हिरव्यागार भारताच्या दृष्टिकोनाशी सुसंगत आहे.

# अनिता फ्रान्सिस यांचा सेवानिवृत्तीपर सत्कार



■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. २८ :
"निष्ठा आणि प्रशासनकुशलता या दोन सुंदर गुणवैशिष्ट्यांच्या बळावर अनिता फ्रान्सीस पिल्ले यांनी शालेय प्रशासनाच्या क्षेत्रात आपली छाप पाडली आहे" असे उद्गार माँ वैष्णवी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष दिलीप पनकुले यांनी काढले.

शांती विद्या भवन प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विभागाच्या वतीने प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका आनिता फ्रान्सीस पिल्ले यांच्या सेवानिवृत्तीच्या निमित्ताने निरोप व सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले. ते पुढे म्हणाले, आनिता फ्रान्सीस पिल्ले यांनी प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका या नात्याने ३५ वर्षे ४ महिने या विभागाला स्थिर प्रशासन दिले.

त्यामुळे संस्थेच्या आणि संस्थेच्या सर्व विभागांच्या वतीने विद्यार्थी आणि परिसरातील पालकांच्या साक्षीने त्यांचा पारिवारिक भव्य गौरव इथे होत आहे. याप्रसंगी संस्थेच्या आणि सर्व विभागांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे संचालक दिलीप पनकुले, प्रमुख पाहुणे संजय खटी, वानाडोंगरी केंद्रप्रमुख लीलाधर चरपे, पत्रकार सुभाष वऱ्हाडे, गणेश धानोरकर आणि संस्थेचे सचिव संग्राम पनकुले,संचालिका सुषमा पनकुले उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेच्या कोषाध्यक्षा डॉ. सुषमा पनकुले यांनी केले. कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी मराठी विभागाचे प्राचार्य डॉ. प्रकाश राठोड, हिंदी विभागाच्या मुख्याध्यापिका ममता ढोरे आणि स्मॉल वंडर्सच्या प्राचार्या कल्पना वादाफळे यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्वेता मेश्राम यांनी केले तर आभार प्राप्ती टेकाडे यांनी मानले.

## दटके, कोहळे आणि डॉ.माने निवडणुकीकरिता नामनिर्देशन पत्र भरणार

नागपूर : विधानसभेच्या मध्य नागपूर मतदारसंघातील भाजपचे उमेदवार प्रविण दटके, पश्चिम नागपूर - सुधाकर कोहळे आणि उत्तर नागपूर मतदारसंघातील उमेदवार डॉ.मिलिंद माने निवडणुकीकरिता नामनिर्देशन पत्र भरण्यासाठी सकाळी 11 वाजता जिल्हाधिकारी कार्यालय पोहोचणार आहे. व्हीसीए मैदान येथून भाजपचे नेते व केंद्रीयमंत्री नितीन गडकरी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावणकुळे आणि भाजपाचे तीनही उमेदवार भव्य रॅलीव्दारे जिल्हाधिकारी कार्यालयात जाणार आहे. पहिल्या यादीत देवेंद्र फडणवीस, कृष्णा खोपडे, मोहन मते यांची नावे होती. इतर तीनही मतदारसंघातील उमेदवारांची नावे जाहीर झाल्यामुळे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत भाजपचे उमेदवार अर्ज दाखल करणार आहे.

# मिस अँड मिसेस इंडिया क्वीन ऑफ नेशन २०२४



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २८ :
मिस अँड मिसेस इंडिया, क्वीन ऑफ नेशन 2024 ने सामाजिक उद्देशाची सेवा करताना आणि सांस्कृतिक विविधतेला प्रोत्साहन देत उत्कृष्टतेने आणि सन्मानाने त्यांचे मिशन यशस्वीरित्या पूर्ण केले.

मेजंता आर्ट्स & एन्टरटेन्मेंट द्वारा समर्थित एच सी जी हॉस्पिटल आणि सुपर प्रायोजित कैजेन क्लब चे अमित धुपे यांनी मिस अँड मिसेस इंडिया, क्वीन ऑफ नेशन 2024 नावाच्या भारतातील सर्वात मोठ्या सौंदर्य स्पर्धेचे आयोजन केले. नागपुरातील हॉटेल रिजेंटा येथे हा कार्यक्रम पार पडला आणि बॉलिवूड अभिनेता अमन वर्मा प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. स्पर्धकांनी त्यांची उत्कृष्टता आणि प्रतिष्ठेचे प्रदर्शन करून कर्करोग जनजागृती कार्यक्रमाला प्रोत्साहन दिले.

संस्थापक मोनिका गणवीर आणि शो डायरेक्टर सनी फ्रान्सिस यांच्या मार्गदर्शनाखाली हा शो आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात संपूर्ण भारतातून 18 स्पर्धकांनी सहभाग घेतला होता आणि त्यात टॅलेंट राउंड, स्पोर्ट्स राऊंड, फोटो-शूट, वैयक्तिक मुलाखत, राष्ट्रीय वेशभूषा, परिचय, रॅम्प वॉक इत्यादी विविध उपक्रमांचा समावेश होता. नागपुरात आयोजित केलेला हा एकमेव कार्यक्रम होता ज्याला उदंड प्रतिसाद मिळाला.

मिस प्रकारात नागपूरची मिस आर्य अवधूत, पहिली उपविजेती तर भंडारा ची मिस तोशिता गभणे आणि दुसरी उपविजेती कानपूर ची मिस जॉयदिप्ता मंडल होती. मिसेस गटात विजेत्या पल्लवी सेन गुजरातच्या वलसाड, तर प्रथम उपविजेत्या दिल्लीच्या गुंजन गोयल आणि द्वितीय उपविजेत्या नाशिकच्या अश्विनी अत्रे होत्या. शालिनी सक्सेना, अनिता सरकार, मिस प्रणयई धुडे आणि मिस कृणाली वारजुकर यांना स्पेशल पॉवर क्वीन मुकुट प्रदान करण्यात आला.

सर्व 18 स्पर्धकांना उप-शीर्षके आणि मुकुट देण्यात आले. हा कार्यक्रम एक भव्य यश आणि सौंदर्य, बुद्धिमत्ता आणि उद्देशाचे एक परिपूर्ण उदाहरण होते.

# सलील देशमुख आज सादर करणार उमेदवारी अर्ज

■ महासागर प्रतिनिधी
काटोल, दि. २८ :

काटोल -नरखेड विधानसभा मतदार संघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार सलील देशमुख यांनी प्रचंड शक्तिप्रदर्शन करीत आपला उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात दाखल झाले मात्र तो पर्यंत तीन वाजून दोन मिनिटे झाली होती.



या कारणास्तव सलील देशमुख यांचा उमेदवारी अर्ज दाखल होऊ शकला नाही. निवडणूक अर्ज दाखल करण्याआधी काटोल नरखेड विधानसभा मतदारसंघाच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या महिला पुरूष कार्यकर्त्यांची प्रचंड संख्या होती, सभेचे ठिकाण, रस्त्यांवरही राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार, कांग्रेस,शिवसेना (उबाठा), आरपीआय, बहुजन क्रांति सेने सह घटकपक्षातील कार्यकर्त्यांच्या उपस्थितींने गर्दीचा उच्चांक प्रस्थापिक केला.

काटोल-नरखेड विधानसभा मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी महाविकास आघाडी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार सलील देशमुख यांनी सोमवार २८आक्टोबर रोजी आपला उमेदवारी अर्ज निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे सादर करण्याकरीता उमेदवारी अर्ज सादर करण्यासाठी काटोलात सकाळी १० वाजल्यापासून मतदार संघाच्या कानाकोपऱ्यातून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे सह महाविकास आघाडीचे घटक पक्षातील पदाधिकारी, कार्यकर्ते डेरेदाखल झालेले होते.

त्यामुळे शहरातील रस्त्यावर वाहनांची प्रचंड वर्दळ होती. काटोल कृषी उत्पन्न बाजार समिती चे भव्य प्रांगणासह नागपूर मुख्य रस्त्यासह अंतर्गत रस्त्यांवर जिकडे-तिकडे अर्ज भरण्यासाठी आयोजित सभेला आलेल्या कार्यकर्त्यांच्या वाहनाचें ताफेच्याताफे पहायला मिळाले.

त्यावेळी त्यांच्यासोबत राज्याचे माजी गृहमंत्री अनिल देशमुख व कुटूंबियांसह रा.का. शरदचंद्रपवार, कांग्रेस, शिवसेना उबाठा, आप, रिपाईसह घटक पक्षाचे जेष्ठ नेते या प्रसंगी उपस्थित होतो.

उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वी प्रचंड गर्दीच्या रेट्यामुळे सलील देशमुख यांना उमेदवारी दाखल करण्यात अखेर दोन मिनिटे उशीर झाल्याने २९आक्टोबर ला उमेदवारी अर्ज दाखल करणार असल्याचे सलील देशमुख यांनी सांगितले.



# राजेंद्र हरणे महाविकास आघाडीत करणार बंड

## सतरंजी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांशी चर्चा करून निर्णय घेणार

■ महासागर प्रतिनिधी
सावरगाव, दि. २८ :

उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना गटाचे माजी जिल्हा प्रमुख व पंचायत समितीचे नरखेडचे माजी सभापती राजेंद्र हरणे यांच्या मदना येथील निवासस्थानी शिवसेना पदाधिकाऱ्यांची आज बैठक पार पडली.

या बैठकीत काटोल व नरखेड तालुक्यातील सर्व शिवसैनिकांनी राजेंद्र हरणे यांना उमेदवारी अर्ज दाखल करून निवडणूक लढवावी असा आग्रह धरला.यावेळी विधानसभेतील सर्व प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी राजेंद्र हरणे यांनी स्वराज्य(सतरंजी) संघटनेच्या सहकाऱ्यांशी चर्चा करून पुढील निर्णय घेऊ असे आश्वासन उपस्थित शिवसैनिकांना दिले.

आजच्या बैठकीला शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे उपजिल्हा प्रमुख प्रशांत मानकर, काटोल विधानसभा संघटक प्रवीण सावरकर, विधानसभा समन्वयक प्रमोद तिजरे, विधानसभा सहसंपर्कप्रमुख प्रफुल गजबे, नरखेड तालुका प्रमुख हिम्मत नखाते, काटोल तालुका प्रमुख माधव अनवाणे, नरखेड तालुका संघटक भारत अरमरकर,कृषी उत्पन्न बाजार समिती नरखेडचे उपसभापती चंद्रशेखर मदनकर, कृषी उत्पन्न बाजार समीतीचे संचालक रुपेश मुंदाफळे,जाणराव ढोकणे, खरेदी विक्री सहकारी संस्थेचे संचालक भागवत भिसे, लोकेश काळे, मोरेश्वर मातकर, कृष्णाजी शेळके, दिनकर फुले, हिराचंद कडू,रमेश रेवतकर, विपुल देवपूजारी, योगेश राऊत, हंसराज गिरडकर, दिनेश चौधरी, राजू माळोदे, उमेश फुले, उमेश शेळके पदाधिकारी उपस्थित होते.

# अवैध धंदे करणाऱ्यांवर पोलिसांचे सर्जिकल स्ट्राईक

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २८ :

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलिस विभागाने अवैध धंदे करणाऱ्यांवर सर्जिकल स्ट्राईक सुरू केली आहे. गत 24 तासांमध्ये शहर पोलिसांनी 9 अवैध दारू विक्रेता 2 सट्टेबाजांना अटक केली. तसेच शस्त्रासह फिरणाऱ्या चौघांना पकडले आहे. एक तडीपार महिलाही पोलिसांच्या हाती लागली आहे.

गुन्हे शाखेच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक पथकाने इमामवाडाच्या बारा सिग्नल परिसरातील रवी शकुलाल तांबे (51) च्या अड्डयावर धाड टाकून 10 लीटर मोहाची दारू जप्त केली. हिंगणा पोलिसांनी वागधरा परिसरात संजय नामदेव लांबट (54) याच्याकडून 15 बॉटल दारू जप्त केली. पारडी पोलिसांनी सनोडिया ढाब्यासमोर दीपक मधू सनोडिया (27) या देशी दारूच्या 13 बॉटलसह पकडले. त्यानंतर प्रकाश कृषी विद्यालयाजवळ मोहम्मद युनूस मोहम्मद युसूफ (47) याला 110 बॉटल देशी दारूसोबत पकडले.

नवीन कामठी पोलिसांनी चरणदास नारायण धुर्वे (58) रा. चित्तरंजननगर याला 16 बॉटलसह पकडले. तसेच रामगड परिसरात आशिष राजू मोहोड (25) याला 48 बॉटलसह पकडण्यात आले. विक्तू बाबानगर धान्य गोदामाजवळ धार्मिक अजय जारोंडे (32) याच्याकडे 15 बॉटल मिळाल्या. मानकापूर पोलिसांनी दीपक बलराम यादव (38) रा. कोलते लेआऊट, गोधनी परिसर याला 55 बॉटल दारूसह अटक केली. कपिलनगर पोलिसांनी नीतेश सुरेंद्र राऊत (35) रा. अंबाटोली, समतानगर याच्याकडून 15 बॉटल दारू जप्त केली.

त्याचप्रमाणे सामाजिक सुरक्षा विभागाने मोठा ताजबाग परिसरात राहणारा सय्यद अल्तमश सय्यद अल्ताफ (19) याला तलवारीसह हैदोस घालताना अटक केली. यशोधरानगर पोलिसांनी मुबारक वकील शाह (21) रा. कुंदनलाल गुप्तानगर याला चाकूसह अटक केली. गिट्टीखदान पोलिसांनी केटीनगर परिसरात अतुलकुमार त्रियोगी शुक्ला (25) रा. बजेरिया याला कोयता घेऊन फिरताना अटक केली. तसेच विश्वासनगर परिसरात सूरज प्रमोद टेंभुरकर (24) याला चाकूसह पकडले. गुन्हे शाखा युनिट 5 च्या पथकाने गस्तीदरम्यान तडीपार महिला गुन्हेगार नलिनी उर्फ सोनी सिद्धार्थ कांबळे (32) रा. विक्तू बाबानगर हिला विना परवानगी शहरात फिरताना अटक केली. युनिट 3 च्या पथकाने किल्ला रोड महाल परिसरात प्रविण विजयसिंग गहलोत (54) याच्या सट्टा अड्डयावर धाड टाकून 4,800 रुपये जप्त केले. तर युनिट 5 च्या पथकाने पारडीच्या बाराद्वारी परिसरात वासुदेव किसन पाटील याच्या सट्टापट्टीवर धाड टाकली. अटक करून 6,800 रुपये जप्त करण्यात आले.

# नबिरा महाविद्यालय काटोल येथे कराटे प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन



■ महासागर प्रतिनिधी,
काटोल, दि. २८ :

सहसंचालक ( उच्च शिक्षण नागपूर विभाग ) व नबीरा महाविद्यालय काटोल यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित कराटे प्रशिक्षण शिबिराला उत्कृष्ट प्रतिसाद. आजच्या या युगात मुली व महिला या बौद्धिक व शारीरिक दृष्ट्या सक्षम असणे आवश्यक आहे, त्याचप्रमाणे स्वयंसिद्ध राहणे हे सुद्धा तेवढेच गरजेचे आहे.

कारण समाजात स्त्रिया व मुलींवर फार मोठ्या प्रमाणात शारीरिक तसेच मानसिक त्रास व अत्याचार होण्याच्या घटनेमध्ये दिवसांदिवस वाढ होत आहे. काही अत्याचार पीडित मुली व महिला आपल्यावर झालेल्या अत्याचाराबाबत समाजात होणाऱ्या बदनामीमुळे पोलीस स्टेशन पर्यंत जाऊन तक्रार करत नसतात त्या ऐवजी आत्महत्येचा मार्ग स्वीकारणे कबूल करतात.

त्याकरिता या बाबीला आळा घालण्याकरिता सहसंचालक (उच्च शिक्षण) नागपूर विभाग व नबीरा महाविद्यालय काटोल यांच्याद्वारे कराटे प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले. या प्रशिक्षणाकरिता पोलीस कराटे प्रशिक्षक मुकेश ठाकरे राष्ट्रीय खेळाडू कु. डिंपल ठाकरे तसेच सहयोगी प्रशिक्षक प्रज्वल टेकाम प्रतीक चिचखेडे सुमित युवनाती यांना नियुक्त केले. उद्घाटन प्रसंगी कार्यक्रम प्रमुख प्रा. अमित खांडेकर डॉ. रिता पाटक डॉ. प्रमोद सलामे, डॉ. पुनीत राऊत डॉ. दमयंती घागरगुंडे डॉ. रीना मेश्राम प्रा. हरीश किनकर प्रा. मुकेश जाधव प्रामुख्याने उपस्थित होते. कराटे प्रशिक्षण शिबिराचा प्रतिसाद बघून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. नवीन तसेच क्रीडा प्रमुख डॉ तेजसिंह जगदाळे यांनी विद्यार्थिनींचे खूप कौतुक केले.

# तंबाखू-गुटखा तस्करावर धाड २.९० लाखांचा माल जप्त

**नागपूर :** तंबाखू आणि गुटखा तस्करीद्वारे शहरात आणून त्यांचा काळाबाजार करणाऱ्या व्यापाऱ्यावर झोन 1 चे डीसीपी लोहित मतानी यांच्या पथकाने धाड टाकली. पोलिसांनी दोन आरोपींना अटक करून 2.90 लाख रुपये किंमतीचा माल जप्त केला. सुरेश अमरलाल हेमनानी (50) आणि सुरेश अजय हेमनानी (28) दोन्ही रा. सिंधी कॉलनी, खामला अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. दोन्ही सुरेश यांचे खामला परिसरात चाहत पान सेंटर आहे. सिंधी कॉलनीमध्ये मीना नवलकिशोर खियानी यांच्या घरी खोली भाड्याने घेऊन त्यांनी गोदाम बनवले होते. अनेक वर्षांपासून दोघेही तंबाखू आणि गुटखा तस्करीत सक्रीय आहेत. पानठेल्यावरून राजरोसपणे प्रतिबंधित सुगंधित तंबाखू, गुटखा आदी वस्तूंची विक्री करतात. डीसीपी मतानी यांना त्यांच्याबाबत माहिती मिळाली. त्यांनी आपल्या विशेष पथकाला त्यांच्यावर धाड टाकून कारवाईचे निर्देश दिले. पोलिसांनी गोदामात धाड टाकली असता विविध कंपन्यांचा सुगंधित तंबाखू, पान मसाला आणि गुटख्याची पोती मिळाली. पोलिसांनी एकूण 2.90 लाख रुपयांचा माल जप्त करून दोन्ही सुरेश यांना ताब्यात घेतले. आरोपींवर बीएनएसच्या कलम 223, 274, 275, आणि 123 अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

# शक्ती प्रदर्शन करत अर्ज दाखल करणार

**काटोल :** काटोल नरखेड विधानसभा मतदारसंघातील काही उमेदवारी अर्ज 28 ऑक्टोबरला दाखल केले असून आज मंगळवारी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची शेवटची मुदत आहे. काटोल नरखेड विधानसभा मतदारसंघातून शेकापचे राहुल देशमुख भाजपचे चरणसिंग ठाकूर मनसेचे सागर दुधाने यांच्यासह काही अपक्ष उमेदवार आपला उमेदवारी अर्ज आज दाखल करणार आहेत. यामध्ये दिग्गज उमेदवार शक्ती प्रदर्शनाने अर्ज दाखल करणार असल्याने विधानसभा निवडणुकीचे वातावरण तापवणारा ठरणार आहे.


# हिंगण्यातून माजी मंत्री रमेश बंग यांना उमेदवारी

■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. २८ :

महाविकास आघाडीत शिवसेना (ठाकरे), काँग्रेस, राष्ट्रवादी (शरद पवार) यांना प्रत्येकी ९० जागांचे वाटप निश्चित करण्यात आले. उर्वरित काही जागांसाठी चर्चा करण्यात येणार आहे. महाविकास आघाडीमध्ये जागावाटपाचा घोळ अजूनही संपलेला नाही. काँग्रेसने काल सकाळी दुसरी यादी जाहीर केल्यानंतर रात्री उशीरा उमेदवारांची तिसरी यादी जाहीर केली.

मात्र, यात नागपूर जिल्ह्यातील हिंगणा येथील उमेदवार जाहीर करण्यात आला नाही. त्यामुळे राष्ट्रवादीने (शरद पवार) रविवारी हिंगणा विधानसभा मतदारसंघातून रमेश बंग यांना उमेदवारी जाहीर केली आहे. त्यामुळे शहरात नागपूर पूर्व आणि आता जिल्ह्यातील हिंगणा व काटोल अशा तीन जागा राष्ट्रवादी शपला मिळाल्या.

या सोबतच हिंगणघाट येथून चार वर्षांपूर्वी मनसेतून राष्ट्रवादीत आलेले अतुल वांदिले तर वाशिम येथून भाजपाचे दिवंगत आमदार पाटणी यांचा मुलगा ज्ञायक पाटणी यांना तिकीट दिले आहे. पूर्वी राष्ट्रवादीकडे ग्रमीणच्या दोनच जागा होत्या. पुन्हा एक जागा राष्ट्रवादीने आपल्या पारड्यात पाडून घेतली. हिंगणाममधून



राष्ट्रवादीने माजी मंत्री रमेश बंग यांना उमेदवारी दिली आहे.

काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेसच्या आघाडी सरकारमध्ये रमेश बंग हे अन्न व नागरी पुरवठा मंत्री होते. पंधरा वर्षांपूर्वी भाजपच्या विजय घोडमारे यांनी त्यांचा पराभव केला होता. त्यावेळी राष्ट्रवादीच्या एका नेत्याने केलेल्या बंडखोरीचा फटका त्यांना बसला होता. आता त्यांचा मुलगा दिनेश बंग हे जिल्हा परिषदेत सदस्य आहेत.

त्यांनीही हिंगणा विधानसभेतून उमेदवारी मागितली होती. मात्र, रविवारी अखेर राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी बंग यांच्या उमेदवारीची घोषणा केली. रमेश बंग हे दोनदा या मतदारसंघातून विजयी झाले तर दोनदा पराभूत झाले आहेत. यावेळी त्यांची थेट लढत भाजपचे समीर मेघे यांच्याशी होणार आहे.

मागील महिन्यात शरद पवार नागपूरला येवून गेले. सार्थक या संस्थेच्या माध्यमातून काही समाजसेवकांचा नागपूरमध्ये सत्कार करण्यात आला. ही संस्था आणि सत्कार समारंभ बंग यांच्याच पुढाकाराने घेण्यात आला. या कार्यक्रमाला रमेश बंग यांच्यासह माजी गृहमंत्री अनिल देशमुख आणि माजी मंत्री सुनील केदार प्रामुख्याने उपस्थित होते.

यावेळी राज्याचे माजी मंत्री व शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते रमेश बंग यांनी हिंगणा विधानसभा मतदार संघावर दावा ठोकला होता. सार्थक संस्थेच्या सत्कार समारंभाला शरद पवारांना आणून त्यांनी आपले इरादे स्पष्ट केले, सोबतच उमेदवारीसाठी उड्या मारणाऱ्या इच्छुकांनाही त्यांनी इशारा दिला होता.

# नागपुर जिल्हा ग्रामीण उपाध्यक्ष राजाराम पांडे यांनी पक्ष सोडला

■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. २८ :

हिंगणा तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शप) गटाचे नागपुर जिल्हा ग्रामीणचे उपाध्यक्ष राजाराम पांडे यांनी आपल्या व्यक्तिगत, शारीरिक व पारिवारिक कारणामुळे पार्टीचे काम करण्यास असमर्थता दर्शविली आहे आणि उपाध्यक्ष पदाचा व प्राथमिक सदस्यत्व सोडल्याचे आज दि 26 /10 /2024 प्रसिध्दी पत्रक काढून जाहीर केले. त्यांनी आपण कोणाच्या दबावात न येता स्व



खुशीने पक्ष सोडल्याचे जाहीर केले आहे. त्यांनी पक्षयाच्या कोणत्याही पदाधिकारी, कार्यकर्ता यांच्यावर कोणत्याही प्रकारचे आरोप किंवा नाराजी व्यक्त केली नाही.

# नागपूर विभागात सतर्कता जागरूकता सप्ताहाचे आयोजन

**नागपूर :** नागपूर विभाग, मध्य रेल्वे, 28 ऑक्टोबर ते 3 नोव्हेंबर 2024 दरम्यान सतर्कता जागरूकता सप्ताह साजरा करत आहे. या उपक्रमाचा भाग म्हणून 28 ऑक्टोबर 2024 रोजी सकाळी 11:00 वाजता कार्यालयाच्या पोर्चमध्ये प्रामाणिकतेची शपथ ग्रहण सोहळा आयोजित करण्यात आला. मनीष अग्रवाल यांनी शपथ दिली, ज्यामध्ये सर्व अधिकारी आणि कर्मचारी सहभागी झाले आणि प्रामाणिकता व भ्रष्टाचारविरोधी उपायांप्रती आपली निष्ठा अधोरेखित केली. यावेळी पी.एस. खैरकर उपस्थित होते. आभार प्रदर्शन सहायक कार्मिक अधिकारी (ए-ह) एस.एल. मनवतकर यांनी केले. हे कार्यक्रम संजी जैन, वरिष्ठ डीपीओ आणि इतर कार्मिक अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे आयोजित करण्यात आले, ज्यामुळे नागपूर विभागाची सतर्कता मूल्यांप्रती असलेली निष्ठा अधोरेखित होते.

# हजारो महिलांनी केला मतदानाचा जागर



## दहाही झोनमध्ये मतदार जनजागृती रॅली

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २८ :

नागपूर शहरातील दहाही झोनमध्ये महिलांनी एकत्र येऊन मतदार जनजागृती रॅली काढली व संपूर्ण शहरात मतदानाचा जागर केला. मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या निदेशांनुसार व अतिरिक्त आयुक्त अजय चारठाणकर यांच्या मार्गदर्शनामध्ये दहाही झोनमध्ये मतदान जनजागृती रॅली काढण्यात आली. या रॅलींमध्ये १० हजारावर महिलांनी सहभाग नोंदवून मतदानासाठी नागरिकांना जागरूक केले.

भारत निवडणूक आयोगाचे मतदारांचे पद्धतशीर शिक्षण आणि निवडणूक सहभाग अर्थात स्वीप कार्यक्रम नागपूर शहरामध्ये यशस्वीरीत्या राबविण्याच्या दृष्टीने नियोजित मिशन युवा व मिशन डिस्टींग्शन अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करणे त्याचप्रमाणे आगामी विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४च्या अनुषंगाने नागपूर शहरी भागातील मतदानाची टक्केवारी वाढविण्याकरिता मतदारांमध्ये जनजागृती करण्याच्या दृष्टीने मतदारांचे पद्धतशीर शिक्षण आणि निवडणूक सहभाग कार्यक्रमा अंतर्गत विविध उपक्रम राबविण्याचे निश्चित करण्यात आले आहे.

नागपूर महानगरपालिका अंतर्गत दीनदयाळ अंत्योदय योजना-राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंतर्गत ११८ वस्ती स्तरीय संस्थांची २५ ऑक्टोबर २०२४ रोजी सभा घेण्यात आली. त्याअनुषंगाने २८ ऑक्टोबर २०२४ रोजी १० झोन अंतर्गत मतदानाची टक्केवारी वाढावी व नागरिकांमध्ये जनजागृती निर्माण व्हावी या उद्देशाने जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले.

सदर जनजागृती कार्यक्रमात झोन मधील सहायक आयुक्त, अधिकारी, कर्मचारी व बचत गटातील ११८ वस्ती स्तरीय संघातील १०,००० महिलांनी सहभाग नोंदविला. त्याचप्रमाणे नागरिकांना मतदान करण्याविषयी संदेश देऊन जागरूक करण्यात आले. मतदाराचा संकल्प म्हणून सर्व सहभागी यांना मतदान करण्याबाबत शपथ देण्यात आली. सदर कार्यक्रम अतिरिक्त आयुक्त (सामान्य) नोडल अधिकारी मनपा अजय चारठणकर आणि उपायुक्त (सविवि) सहायक नोडल अधिकारी डॉ. रंजना लाडे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आले.

मनपा आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांनी नागपूर शहरातील सर्व नागरिकांनी २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदानाचा हक्क बजाविण्याबाबत आवाहन केले आहे. मतदार जनजागृतीसाठी नागपूर महानगरपालिकेने महत्वपूर्ण पाऊल टाकले आहे. मनपाद्वारे घरोघरी देण्यात येणाऱ्या पाणी बिलावरूनही जनजागृती करण्यात येत आहे.

मनपाच्या पाणी बिलावर मतदार जनजागृतीचा संदेश देणारी जाहिरात करण्यात आली आहे. विधानसभा निवडणुकीसाठी २० नोव्हेंबरला शहरातील जास्तीत जास्त मतदारांनी मतदान करावे व शंभर टक्के मतदान व्हावे या हेतूने मनपाद्वारे पुढाकार घेण्यात आला आहे.

# तोरण, दिवे, फुलांच्या माळांनी दिवाळीची सजावट

■ महासागर प्रतिनिधी
मौदा, दि. २८ :

वर्षभरात साजऱ्या केल्या जाणाऱ्या विविध सणांपैकी दिवाळी या सणाचे आबालवृद्धापासून ते लहानांपर्यंत सर्वांनाच विशेष आकर्षण असते. पाच दिवसांच्या या सणामध्ये प्रत्येक दिवसाचे एक वेगळे वैशिष्ट्य असल्याने त्या दिवसासाठी लागणाऱ्या विविध स्वरूपांतील वस्तू खरेदी करण्यासाठी ग्राहकांची बाजारपेठेत आत्तापासूनच गर्दी होत आहे. यामध्ये महिला वर्गाकडून आता घरगुती सजावटीचे साहित्य खरेदी केले जात आहे.

यात विशेष करून हँडमेड वस्तू, तोरण, फुलांच्या माळा आकाशकंदील यांसह लाइटिंगच्या




माळा, रंगीबेरंगी, रांगोळी छापे अशा विविध प्रकारच्या साहित्याला मागणी वाढली आहे. तालुक्यात दिवाळीच्या सणानिमित्त बाजारपेठेत कपड्याची दुकाने, रांगोळी, पणती दिवे, आकाश दिवे, कृत्रिम सजावटीचे साहित्य फटाके याशिवाय मिठाई गृहोपयोगी वस्तू, इलेक्ट्रॉनिक वस्तू, किराणा साहित्य, फुल आणि सराफा बाजारपेठेत ग्राहकांनी दिवाळीची तयारी करून ठेवली आहे. यामध्ये महिला वर्गाकडून आता कृत्रिम फुलांची रांगोळी, साहित्याची रांगोळीच्या छापांची तसेच दिवे, पणती यांच्या माळा कृत्रिम फुलांचे तोरण, स्वस्तिक आणि देवदेवतांच्या मूर्ती अशा प्रकारचे साहित्य खरेदी केले जात आहे. शहरातील विविध चौक या ठिकाणी विविध प्रकारच्या सजावटीच्या साहित्याचे दुकाने थाटली आहेत. महिला वर्गासह मुलींची खरेदीसाठी रेलचेल सुरु आहे. दिवाळीच्या सणाला रुचकर फराळ बनविण्यासाठी महिलांना किमान चार-पाच दिवस स्वयंपाक घरातच काढावे लागतात. साहित्याच्या खरेदीपासून प्राथमिक तयारी ते प्रत्येक पदार्थ बनवेपर्यंत व त्यानंतरची स्वच्छतेच्या कामाला पाहुन अनेक नोकरदार महिलांनी तयार फराळाला प्राधान्य दिले आहे. हा फराळ बनविणाऱ्या ऑर्डर घेण्यास सुरुवात झाली आहे.

> सणासोबतच दिवाळीनिमित्त विविध प्रकारचे सजावट साहित्य शहरात आणि विविध भागांतून मागविले आहे. सर्व प्रकारांमध्ये मेड इन इंडियाचे चांगल्या दजार्चे साहित्य महिला वर्गाकडून खरेदी केले जात आहेत. विशेष करून मेटलचे, उरलीचे दिवे महिला खरेदी करीत आहेत. तोरण दिवे माळा फुलांचे कृत्रिम तोरण यांची खरेदी जोरात आहे.
>
> **एक दुकान विक्रेता**

# पूर्व विदर्भातील ५ जिल्ह्यांतून ठाकरे गट हद्दपार

## नाना पटोले यांची रणनीती यशस्वी; काँग्रेसच्या बालेकिल्ल्यापासून ठाकरेंना दूर ठेवण्यात यश

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २८ :



जागा वाटपाच्यावेळी मुंबई आणि पश्चिम महाराष्ट्रातील नेतृत्वापुढे शरणागती न पत्करता मेरिटच्या आधारावर काँग्रेसला अधिक जागा मिळाव्या म्हणून आग्रही आणि आक्रमक भूमिका घेणारे प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष नाना पटोलेंमुळे महाविकास आघाडीतील शिवसेना उबाठा, राष्ट्रवादी शप गटाला लगाम घालण्यात यश आले. परिणामी विदर्भात उबाठा शिवसेनेला हद्दपार व्हावे लागले. नागपूर शहरातील सर्वच्या सर्व जागा काँग्रेस लढवणार असे शहराध्यक्ष विकास ठाकरे यांनी पूर्वीच सांगितले होते.

एकत्रित शिवसेना आणि भाजपाची युती असताना भाजपाला शिवसेनेचे लाड पुरवावे लागत होते. आता तशी परिस्थिती नाही. परिणामी नाना पटोले यांनी आक्रमक भूमिका घेत विदर्भातील जागा सोडणार नाही यावर ठाम राहिले. परिणामी उबाठाला हद्दपार व्हावे लागले.

पूर्व विदर्भातील पाच जिल्ह्यांमधून शिवसेना ठाकरे गट पूर्णपणे हद्दपार झाला आहे. नाना पटोलेनी आपल्या बालेकिल्ल्यात ठाकरेंना शिरकाव करू दिला नाही. पूर्व विदर्भात ३२ विधानसभा क्षेत्रांपैकी ठाकरे गटाला फक्त रामटेकची एकमेव जागा देऊन बोळवण केली.

पूर्व विदर्भातील ३२ जागांपैकी २३ जागी काँग्रेस, ८ जागी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्ष तर फक्त १ ठिकाणी शिवसेना ठाकरे गट निवडणूक लढवत आहे. पूर्व विदर्भातील सर्व सहा जिल्ह्यात काँग्रेसचे उमेदवार निवडणुक लढवित आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे उमेदवार फक्त चंद्रपूर वगळता पूर्व विदर्भातील उर्वरित पाच जिल्ह्यात निवडणुक रिंगणात आहे.

मात्र शिवसेना ठाकरे गटाला फक्त नागपूर जिल्ह्यात रामटेकमध्ये प्रतिनिधित्व मिळाले आहे.. वर्धा, गोंदिया, भंडारा, चंद्रपूर आणि गडचिरोली या पाचही जिल्ह्यात शिवसेना ठाकरे गटाला एकही जागा सोडण्यात आलेली नाही.

# कुंपणात वीज प्रवाह सोडल्यास होणार गुन्हा दाखल

## महावितरणने घेतली गंभीर दखल

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २८ :




वन्य प्राण्यांपासून होणारी पिकाची नासाडी रोखण्यासाठी काही शेतकरी कुंपणात वीज प्रवाह सोडत असल्याचे महावितरणच्या निदर्शनास आले आहे. परंतु त्यामुळे वन्य प्राण्यांबरोबरच शेतात कामांसाठी गेलेल्या आणि अनावधानाने कुंपणास स्पर्श करणा-या शेतकऱ्यांचा वीजेचा शॉक लागून मृत्यू होत असल्याची बाब समोर आली आहे.

शिवाय यासाठी वीजही आकडे टाकून चोरून वापरत असल्याचे दिसून आले आहे. याची महावितरणने गंभीर दखल घेतली असून यापुढे कुंपणात अनधिकृत वीज प्रवाह सोडलेला आढळल्यास संबंधितावर विद्युत कायद्याच्या विविध कलमा अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येणार आहे.

मागिल काही महिन्यांपासून विजेचा शॉक लागून शेतकऱ्यांचा मृत्यू झाल्याच्या घटना वारंवार घडत आहे. याची अधिक खोलात जाऊन चौकशी केली असता महावितरणच्या असे लक्षात आले की, शेतकरी पिकाच्या संरक्षणासाठी वीज वाहिन्यांवर आकोडे टाकून वीज प्रवाह थेट कुंपणात सोडतात. त्यामुळे अनावधानाने संपर्कात आलेल्या प्राण्यांसोबत शेतक-यांचेही मृत्यू झाल्याच्या काही घट्ना उघडकीस आल्या आहेत.

एकंदरीत हा प्रकार वाटतो तितका साधा नसून वीजचोरी बरोबरच सदोष मनुष्यवध यांसारख्या गंभीर गुन्ह्यांशी संबंधित आहे. तसेच जीवितहानी झाल्यानंतर त्याचा दोष विनाकारण महावितरणवर थोपण्याचा आणि महावितरण कडून भरपाई मागण्याचा कल देखील दिसून येत आहे.

वीज वाहिन्यांवर अनधिकृतपणे आकोडे टाकून कुंपणात थेट वीज प्रवाह सोडण्याच्या या गंभीर प्रकाराला आळा घालण्यासाठी महावितरणने कायदेशीर कारवाई करण्याचे ठरविले आहे. यासाठी, तांत्रिक कर्मचारी तसेच भरारी पथकाच्या माध्यमातून शेतशिवारात गस्त घालण्यात येणार आहे. त्यावेळी हा प्रकार आढळला तर संबंधित शेतक-यावर विद्युत कायदा 2003 च्या विविध कलमाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येणार आहे तसेच संभाव्य जीवितहानीची शक्यता लक्षात घेऊन संबंधितावर फौजदारी गुन्हा दाखल करण्याची विनंती पोलिस विभागाला करण्यात येणार असल्याचे महावितरणने कळविले आहे.

आकोडे टाकून वीज चोरी करून शेताच्या कुंपणामध्ये वीज प्रवाह सोडणा-या शेतक-याला यापुढे गंभीर कायदेशीर कारवाईला सामोरे जावे लागणार असून संभाव्य जीवित हानीची शक्यता लक्षात घेता याबाबत फौजदारी गुन्हाही नोंदविला जाऊ शकतो याची दखल घेत शेतकऱ्यांनी स्वतः या प्रकारामध्ये सहभागी होऊ नये आणि कोणी सहभागी होत असल्यास त्याला तसे करण्यापासून परावृत्त करावे, असे आवाहन देखील महावितरणने केले आहे.

# कवी कुलगुरू कालिदास स्मारकाचे श्रमदानातून स्वच्छता अभियान



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २८ :

नुकताच ९३ वर्षीय कन्नड लेखक व तत्त्वज्ञ पद्मभूषण डॉ.एस.एल. भैरप्पा यांना महर्षी वाल्मिकी पुरस्काराने कवी कुलगुरू कालिदास सभागृह नागपूर या ठिकाणी आयआय एमचे संचालक भीमराव मैत्री व कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठाचे कुलगुरू प्रोफेसर हरे राम त्रिपाठी व हिंदू रिसर्च फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रमुख विश्वस्त रेड स्वस्तिक सोसायटीचे महाव्यवस्थापक व या उपक्रमाचे संकल्पक पोलीस महासंचालक डॉ.टी.एस.भाल अशा अनेक मान्यवरांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला होता.

यावेळी डॉक्टर भैरप्पा यांनी कवी कुलगुरू कालिदास स्मारकाला भेट देण्याचे इच्छा व्यक्त केली. स्मारकाची श्रद्धेने पाहणी करत असताना वाढलेले गवत व स्मारकाची झालेली दुरावस्था डॉ भैरप्पा व्यथित झाले.

लगेच दुसऱ्या दिवशी हिंदु रिसर्च फाउंडेशन च्या पुढाकाराने श्रमदानातून स्वच्छता अभियान राबवण्यात आले. कृष्णा भाल अध्यक्ष हिंदुत्व सेवा संघ रामटेक व जगन्नाथराव गराट यांच्या मार्गदर्शनाखाली स्मारकाची स्वच्छता मोहीम राबवली गेली.

यावेळी स्वच्छता श्रमदान कार्यक्रमास मोठ्या प्रमाणात स्वयंसेवक हिंदू सेवा संघ, सृष्टी सौंदर्य बहुउद्देशीय संस्था, योगीराज हॉस्पिटल, एनटीपीएस हिवरा बाजार, विदर्भ साहित्य संघ, एकविरा माता भक्तगण, ए .बी. व्हीपी, यावेळी उपस्थित झालेल्या सर्व स्वयंसेवकांचे हिंदू रिसर्च फाउंडेशन व हिंदू सेवा संघातर्फे आभार व्यक्त करण्यात आले.

# व्यावसायिकाला लाखोंचा गंडा

**नागपूर :** कर्नाटक येथील एका कंपनीच्या मालकाने व्यवस्थापकासोबत मिळून शहरातील एका व्यावसायिकाची 35.47 लाख रुपयांनी फसवणूक केली. या प्रकरणी सीताबर्डी पोलिसांनी चिरायू दिलीप अग्रवाल (27) रा. तीनखेडे लेआऊट, सिव्हील लाईन्सच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. आरोपींमध्ये पीडब्ल्यूआयपी कंपनीचे संचालक धनराज कीडियूर आणि व्यवस्थापक कार्तिक एम. दोन्ही रा. बंगळुरूचा समावेश आहे. चिरायू यांचा तांदूळ आयात-निर्यातचा व्यवसाय आहे. देशातील वेगवेगळ्या राज्यांतून ते तांदूळ खरेदी करतात आणि नंतर विदेशात त्याची विक्री करतात. आरोपींच्या कंपनीशी अनेक वर्षांपासून त्यांचा व्यवहार सुरू होता. चिरायू अडव्हांसमध्ये पैसे देत होते आणि नंतर आरोपी माल पाठवत होते. तसा लिखित करारनामाही करण्यात आला होता. 22 डिसेंबर 2022 ते 27 ऑक्टोबर 2024 पर्यंत चिरायूने आरोपींना मालासाठी 35.47 लाख रुपये दिले, मात्र आरोपींनी तांदूळ पाठवलाच नाही. अनेक दिवस लोटूनही माल न मिळाल्याने चिरायून सीताबर्डी पोलिसात तक्रार केली.

## गांजा विक्रेत्याला पाठलाग करून पकडले

**नागपूर :** नवीन कामठी पोलिसांनी गस्तीदरम्यान संशयाच्या आधारावर एका व्यक्तीला थांबण्याचा इशारा दिला. मात्र त्याने थांबण्याऐवजी पळ काढला. पोलिसांनी पाठलाग करून त्याला पकडले. झडतीमध्ये त्याच्याजवळ 1 किलो 120 ग्रॅम गांजा मिळाला. उमेश माणिक रामटेके (34) रा. चंद्रमणीनगर, कामठी असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. ऑपरेशन थंडर अंतर्गत रविवारी रात्री 2 वाजताच्या सुमारास नवीन कामठी पोलिस ठाण्यांतर्गत गस्त घालून अभिलेखावरील गुन्हेगारांचा शोध घेत होते. या दरम्यान वित्तू बाबानगरात धान्याच्या गोदामाजवळ पोलिसांना उमेश दुचाकी वाहनाने संशयास्पदरित्या फिरताना दिसला. थांबण्याचा इशारा दिला असता त्याने पळ काढला. पोलिसांनी पाठलाग करून त्याला पकडले. झडतीमध्ये वाहनाच्या डिक्कीत पोलिसांना गांजा मिळाला. पोलिसांनी त्याच्याकडून गांजा, मोबाईल आणि दुचाकी वाहनासह 1 लाख रुपयांचा माल जप्त केला आहे. एनडीपीएस ॲक्ट अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला.

# २४ तासात तयार झाले १४,१७४ दोसे

## शेफ विष्णू मनोहर यांनी रचला इतिहास



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २८ :

थांबता 24 तास डोसे बनविणे आणि 24 तासात जास्तीत जास्त डोसे बनविणे असे दोन विश्वविक्रमांवर आपले नाव कोरत आंतरराष्ट्रीय ख्यातीचे शेफ विष्णू मनोहर यांनी इतिहास रचला. रविवार सकाळी 7 पासून दोसे बनविण्यास सुरुवात केलेल्या विष्णू मनोहर यांनी सोमवारी सकाळी 9 वाजेपर्यंत 24 तासात 14174 दोसे तयार केले. पोलिस आयुक्त डॉ. रविंद्र सिंगल यांच्या हस्ते त्यांना वर्ल्ड रेकार्ड्स बुक ऑफ इंडियाचे प्रमाणपत्र देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

गिरीशभाऊ गांधी खुले रंग मंचावर तीन वेगवेगळ्या तव्यावर एकावेळी तीस दोसे करत निर्धारित केलेला 5000 दोस्यांचा टप्पा विष्णू मनोहर यांनी रविवारी सायंकाळी 7 वाजताच म्हणजे बारा तासातच पूर्ण केला होता. त्यानंतरही त्यांनी दोसे तयार करणे सुरूच ठेवले आणि न थांबता 24 तास दोसे बनवून विक्रमाला गवसणी घातली.

### 500 किलो घोळ, 1000 किलो चटणी अन 5000 केळीची पाने

विष्णू मनोहर यांना 14174 दोसे तयार करण्यासाठी 500 किलोहून अधिक दोस्याचा घोळ उपलब्ध करून दिला तर दोस्यांसोबत खाण्यासाठी 1 हजार किलो चटणीचा वापर करण्यात आला. दक्षिण भारतीय पदार्थ असलेला हा दोसा तिकडे केळीच्या पानावर वाढला जातो. या उपक्रमात जळगावचे मनिष पात्रीकर यांनी 5000 हून अधिक केळीची पाने विष्णू मनोहर यांना या उपक्रमासाठी उपलब्ध करून दिली.

विष्णू मनोहर यांच्या चाहत्यांनी 24 तास दोसे खाण्यासाठी गर्दी करत त्यांच्या धाडसाचे कौतुक केले. रात्री 12 वाजले तरी दर्दींची गर्दी काही कमी झाली नव्हती. सकाळी सात वाजता परत एकदा लोकांनी जमायला सुरुवात केली.

विष्णू मनोहर यांना दर तासाला नियमानुसार पाच मिनिटे विश्रांती घेण्याची मुभा होती. परंतु त्यांनी 24 तासात केवळ तीन वेळा एकुण दोन तास विश्रांती घेतली. या काळात त्यांनी केवळ लिक्वीड डाएट घेतले. अतिशय जिद्दीने हा विक्रम पूर्ण केल्यानंतर रविवारी सकाळी 9 वाजता विष्णू जी रसोईमध्ये एकच जल्लोष झाला. गाण्यांवर ठेका धरत सर्वांनी नृत्य केले त्यात विष्णू मनोहर यांनी सहभागी होत आनंद व्यक्त केला.

विष्णू मनोहर एकीकडे सलग 24 तास दोसे तयार करत असतानाच त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणा-या सहका-यानीही तेवढीच मेहनत केली. विष्णूजी की रसोईची 25 जणांची चमू आणि मास्टर रेसिपीची संपूर्ण कुकींग टीम, स्थानिक व आंतरराष्ट्रीय प्रतिनिधींचे, प्रायोजकांचे त्यांना अमूल्य असे सहकार्य लाभले.

# ईडीने कॉर्पोरेट पॉवर लिमिटेडची मालमत्ता जप्त

**नागपूरः** अंमलबजावणी संचालनालयाच्या (ईडी) नागपूर उप-क्षेत्रीय कार्यालयाने मेसर्स कॉर्पोरेट पॉवर लिमिटेड आणि त्यांचे प्रवर्तक/संचालक मनोज जयस्वाल, अभिजीत जयस्वाल, अभिषेक जयस्वाल आणि इतर यांच्या महाराष्ट्र, पश्चिम बंगाल, बिहार, झारखंड आणि आंध्र प्रदेशमधील विविध ठिकाणी असलेल्या जंगम आणि स्थावर मालमत्ता तात्पुरत्या जप्त केल्या आहे. संलग्न मालमत्तांमध्ये मेसर्स कॉर्पोरेट पॉवर लिमिटेड आणि मनोज कुमार जयस्वाल आणि इतरांच्या कुटुंबातील सदस्यांव्यतिरिक्त विविध शेल कंपन्यांच्या नावावर घेतलेल्या जमिनीवरील मालमत्ता, शेअर्स, विविध जमीनी मालमत्ता आणि इमारतींचा समावेश आहे. या प्रकरणात आजपर्यंत एकूण ७२७ कोटींची मालमत्ता संलग्न करण्यात आली आहे. ईडीने मेसर्स कॉर्पोरेट पॉवर लिमिटेड आणि तिचे प्रवर्तक आणि संचालक, मनोज जयस्वाल, अभिजीत जयस्वाल, अभिषेक जयस्वाल आणि इतरांविरुद्ध सेंट्रल ब्युरो ऑफ इन्व्हेस्टिगेशनद्वारे नोंदवलेल्या एफआयआरच्या आधारावर तपास केला. गुन्हेगारी कट, फसवणूक आणि खोटेपणाचे आरोप लावण्यात आले.

## कत्तलखाने व मांस विक्रीची दुकाने बंद

**नागपूर :** लक्ष्मीपूजन निमित्त शुक्रवारी १ नोव्हेंबर २०२४ रोजी नागपूर शहरातील सर्व कत्तलखाने व मांस विक्रीची दुकाने बंद राहणार आहे. या संदभार्तील आदेश मनपाचे घनकचरा व्यवस्थापन विभाग संचालक डॉ. गजेंद्र महल्ले यांनी निर्गमीत केले आहे. आदेशाचे उल्लंघन करतील त्यांच्यावर कार्यवाही करण्यात येईल.

# दक्षिण-पश्चिम नागपूरसाठी वंचितचे

## भीमपुत्र विनय भांगे यांची उमेदवारी दाखल



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २८ :

आज दक्षिण-पश्चिम नागपूर विधानसभा मतदार संघातील वंचित बहुजन आघाडीचे अधिकृत उमेदवार भीमपुत्र विनय भांगे यांनी हजारोंच्या संख्येने वंचित बहुजन समर्थक, वंचित बहुजन आघाडीचे शहर कार्यकारिणीतील सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्या जोशपूर्ण उपस्थितीत उमेदवारी अर्ज दाखल केला. त्यांनी आपल्या उमेदवारीच्या माध्यमातून समाजातील वंचित, बहुजन आणि धर्मनिरपेक्ष मतदारांचे प्रतिनिधित्व करण्याचा व त्यांच्या हक्कांचे रक्षण करण्याचा निर्धार व्यक्त केला.

भीमपुत्र विनय भांगे यांच्या रॅलीत संविधान चौक येथून हजारोंच्या संख्येने वंचित बहुजन मतदार आणि समर्थकांनी सहभाग घेतला. सर्व वंचित बहुजन व धमरनिरपेक्ष मतदार व समर्थकांचे धन्यवाद व्यक्त करीत भीमपुत्र भांगे यांनी त्यांना मतदार संघाच्या प्रगतीसाठी, आरक्षण वाचविण्यासाठी आणि वंचित बहुजनांच्या उद्धारासाठी सातत्याने संघर्ष करण्याचे वचन दिले.

# शहरातील ५९ पुतळ्यांची स्वच्छता

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २८ :



स्वच्छ, सुंदर आणि हरित नागपूर साकारताना शहरातील विविध चौक, महापुरुषांचे पुतळे, स्मारके स्वच्छ दिसणे अत्यंत महत्त्वाचे आहे. स्वच्छ दिवाळी, शुभ दिवाळी अभियाना अंतर्गत नागपूर महानगरपालिकेद्वारे पहिल्यांदाच सामूहिकरीत्या शहरातील विविध ५९ पुतळे, स्मारक, चौकांची सखोल स्वच्छता करण्यात आली. या अभिनव उपक्रमाला नागरिकांनी देखील उत्तम प्रतिसाद दर्शवित मनपाच्या कायार्चे कौतुक केले.

मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या निदेर्शानुसार, अतिरिक्त आयुक्त आंचल गोयल व अजय चारठाणकर यांच्या मार्गदर्शनात नागपूर महानगरपालिकेद्वारे शहरातील विविध स्मारक, पुतळ्यांची स्वच्छता करण्यात आली. यंदाच्या दिवाळीत संपूर्ण शहर स्वच्छ व सुंदर साकारण्यासाठी मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी पुढकार घेत केंद्र शासनाच्या ह्यस्वच्छ दिवाळी, शुभ दिवाळीह्ण अभियानाच्या माध्यमातून २१ ते ३१ ऑक्टोबर दरम्यान शहरात विविध उपक्रम राबविण्याचे ठरवले आहे. या अंतर्गत सोमवारी (ता.२८) मनपाच्या दहाही झोनमधील महापुरूष, स्वातंत्र्य सेनानी यांच्या ५९ पुतळ्यांची व चौकांची सखोल स्वच्छता करण्यात करण्यात आली.

मनपाच्या अतिरिक्त आयुक्त आंचल गोयल यांनी शहरातील विविध ठिकाणी भेट देत स्वतः पुतळ्यांच्या स्वच्छता मोहिमेत सक्रीय सहभाग नोंदविला. त्यांनी स्वतः पुतळ्यांच्या सभावातली असणारा कचरा स्वच्छ केला. यावेळी उपायुक्त श्री विजय देशमुख, व घनकचरा विभाग प्रमुख उपायुक्त डॉ. गजेंद्र महल्ले उपस्थित होते.

स्वच्छता मोहिमेत उपायुक्त मिलिंद मेश्राम यांच्या नेतृत्वात लक्ष्मीनगर झोन येथील अजनी चौकातील यशवंतराव चव्हाण, माजी पंतप्रधान राजीव गांधी, दीक्षाभूमी चौकातील साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यांची सखोल स्वच्छता करण्यात आली. तर उपायुक्त प्रकाश वराडे यांच्या नेतृत्वात धरमपेठ झोन येथील शंकरनगर चौकातील स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा पुतळा, गोकुळपेठ चौकातील लालबहादूर शास्त्री यांचा पुतळा, विद्यापीठ ग्रंथालय चौकातील सेनापती बापट यांचा पुतळा, विधानभवन समोर परिसरातील दादासाहेब कन्नमवार, महाराष्ट्र बँक सीताबडीर्तील धर्मवीर डॉ. मुंजे यांचा पुतळा, सीताबर्डी हिंदी मोर भवन येथील झाशी राणी लक्ष्मीबाई यांचा पुतळा, रामदासपेठेतील अर्थ शास्त्रज्ञ के. आर. नायडू यांचा पुतळा, सिव्हिल लाईन्स व्हि सीए परिसरातील सी. के. नायडू यांचा पुतळा, आकाशवाणी चौकातील कायदेपंडित मनोहर रा.बोबडे यांचा पुतळा, रामनगर चौकातील नरवीर बाजीप्रभू देशपांडे यांचा पुतळा, विद्यापीठ विधान भवन चौकातील गोंड राजे बख्त बुलंदशाह यांचा पुतळा, फूल बाजार मार्केट समोर क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचा पुतळा, मनपा मुख्यालयातील बॅरि. शेषराव वानखेडे, अंबाझरी उद्यान परिसरातील क्रांतीगुरू लहुजी साळवे, मानस चौकातील संत गोस्वामी तुलसीदास यांचा पुतळा, वाल्मिकिनगर गोकुळपेठ येथील महर्षि वाल्मीकि स्मारक, अंबाझरी येथील अर्धनारी नटेश्वर पुतळा, अंभ्यंकर नगर येथील बॅरि. मोरूभाऊ अभ्यंकर यांचा पुतळा, बजाज नगर चौकातील जमनालाल बजाज यांचा पुतळाची स्वच्छता करण्यात आली.

तसेच सहायक आयुक्त नरेंद्र बावनकर यांच्या नेतृवात हमनुमानगर झोन येथील मानेवाडा रोड स्थित राष्ट्रसंत तुकडोजी महाराज पुतळा, क्रीडा चौकातील मशाल पुतळा स्वच्छ करण्यात आला. तर सहायक आयुक्त प्रमोद वानखेडे यांच्या नेतृत्वात धंतोली झोन येथील महाल गांधीसागर तलाव परिसरातील लोकमांन्य बाळ गंगाधर टिळक यांचा पुतळा, घाटरोड मोक्षधाम स्थित सरदार वल्लभभाई पटेल यांचा पुतळा, फुले मार्केट येथील महात्मा ज्योतीबा फुले यांचा पुतळा, इंदिरानगर कुंदनलाल गुप्ता वाचनालय परिसरातील कुंदनलाल गुप्ता यांचा पुतळा, घाटरोड बस स्टँड समोरील रुपचंद जाधव यांचा पुतळा, कॉटन मार्केटातील तुळशीबाई झुरे यांचा पुतळा, मोक्षधाम येथील अर्धनारी नटेश्वर पुतळा, बालोद्यान गांधीसागर तलाव परिसरातील साने गुरूजी यांचा पुतळा स्वच्छ करण्यात आला.

सहायक आयुक्त घनश्याम पंधरे यांच्या नेतृत्तवात संतरंजीपुरा झोन येथील मिरची बाजार इतवारी मस्कासाथ येथील पं. जवाहरलाल नेहरू पुतळा, शांतीनगर वसाहत श्रीमती इंदिरा गांधी, दुर्गावती चौकातील राणी दुर्गावती पुतळा, जागनाथ बुधवारी चौकातील भारत माता पुतळा व परिसर स्वच्छ करण्यात आला. सहायक आयुक्त विजय थुल यांच्या नेतृत्वात वर्धमाननगर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याची स्वच्छता करण्यात आली. तर सहायक आयुक्त हरिष राऊत यांच्या नेतृत्तवात आशीनगर झोन येथील कमाल चौकातील कर्मवीर बाबू आवळे, इंदोरा चौकातील बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे पुतळा, दुर्गावती चौक बिनाकीतील राणी दुर्गावती पुतळा स्वच्छ करण्यात आला.

, मंगळवारी झोन मध्ये सहायक आयुक्त अशोक घरोटे यांच्ये नेतृत्तवात अंजुमन कॉम्लेक्स समोर सदर येथील बॅरि. सखारामपंत मेश्राम पुतळा, जरीपटका चौकातील शहीद खेमू पुतळा, मानस चौकातील सुभाषचंद्र बोस यांचा पुतळा व परिसर स्वच्छ करण्यात आला. यावेळी स्वच्छता कर्मचार्यांनी पुतळा व परिसराची सखोल स्वच्छता केली.